www.rajdand.com
सातारा/पुणे, शुक्रवार
02.02.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । माघ कृ १२
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
२५ वर्षे विश्वासार्हतेची

# वित्तीय तुटीवर नियंत्रण पायाभूत सुविधांवर भर

## अंतरिम अर्थसंकल्पात भविष्याचे दिशादर्शन, मोठया घोषणा, कर सवलतींना बगल

***नवी दिल्ली :*** *लोकसभा निवडणूक अवघ्या दोन महिन्यांवर येऊन ठेपली असताना लेखानुदानातून लोकप्रिय घोषणा टाळण्याचे धाडस गुरुवारी केंद्रीय अर्थमंत्री निमर्ला सीतारामन यांनी दाखवले. ह्यरेवडयाह्न वाटून मतदारांना चुचकारण्याऐवजी २०३०, २०४७ असे काहीसे दूरवरील ह्यविकसित भारताह्नचे स्वप्न त्यांनी दाखविले. करसवलतीसारख्या लोकप्रिय घोषणा न करता दीघर्कालीन नियोजनाची ग्वाही त्यांनी दिली. यातून सलग तिसऱ्यांदा निवडून येण्याचा आत्मविश्वास असल्याचे मोदी सरकार व भाजपने अधोरेखित केल्याचे मानले जात आहे.*



सीतारामन यांनी गुरुवारी आपला सलग सहावा अथर्संकल्प सादर केला. ह्यआत्ता लेखानुदान मांडले गेले असून जूनमध्ये आमचे सरकार पूर्ण अथर्संकल्प सादर करेल व विकसित भारताचा आराखडा देशवासीयांसमोर ठेवेल, असा विश्वास त्यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच व्यक्त केला. लेखानुदानामध्ये लोकाभिमुख घोषणा झाल्या नसल्या तरी मध्यमवगीय करदाते, निम्न उत्पन्नधारक, शेतकरी, महिला आदी वर्ग नाराज होणार नाहीत याची दक्षता घेतल्याचे काही निणर्यांवरून दिसून येत आहे. पर्यटन, गृहनिर्माण आणि अक्षय्य ऊर्जा आदी क्षेत्रांतील गुंतवणुकीला सरकारने प्राधान्य दिले असून शाश्वत पायाभूत सुविधांच्या माध्यमातून रोजगार निमितीवर लक्ष केंद्रित केले आहे.

### करररचना जैसे थे

आयात शुल्कासह प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांच्या दरश्रेणीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. नव्या प्रणालीमध्ये पूवीप्रमाणे ७ लाखांपर्यंत वार्षिक उत्पन्न करमुक्त राहील.

### पायाभूत सुविधांना चालना

रेल्वे, विमान वाहतूक आणि बंदरांसह पायाभूत सुविधांचा विकास वेगाने केला जाणार असून पुढील वर्षासाठी भांडवली खर्च ११.१ टक्क्यांनी वाढून तो ११.११ लाख कोटी रुपये करण्यात आला आहे.

### विकासदर १०.५ %

आगामी आर्थिक वर्षामध्ये नाममात्र विकासदर १०.५ टक्के राहील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. याला अनुसरून यंदाच्या आर्थिक वर्षात नाममात्र सकल राष्ट्रीय उत्पन्न २ कोटी ९७ लाख ७१ हजार ८०८ कोटी रुपये राहण्याचा अंदाज आहे.

### मध्यमवर्गासाठी घरे

भाडयाच्या घरातील रहिवासी, झोपडपट्ट्या, चाळी वा अनधिकृत वसाहतींमध्ये राहणाऱ्यांना स्वतःचे घर विकत घेण्यासाठी वा बांधण्यासाठी योजना जाहीर केली जाणार आहे.

### वित्तीय तूट ५.१ %

२०२३-२४ साठी सुधारित वित्तीय तूट ५.८ टक्के असेल तर, २०२४-२५ मध्ये ही तूट ५.१ टक्के असेल असा अंदाज आहे. वित्तीय तूट ४.५ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचे लक्ष्यही सरकारने ठेवले आहे.

### राज्यातील रेल्वेला १५,५५४ कोटी

अथर्संकल्पात महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी १५,५५४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तीन नवीन रेल्वे कॉरिडॉर मंजूर केले असून त्यामुळे ४० हजार किमीचे नवे रेल्वे मार्ग तयार होतील.



### नव्या संज्ञा, नवे अर्थ..

सीतारामन यांनी या अथर्संकल्पातही ग्यान, एफडीआय, जीडीपी, ३-डी अशा नव्या परिवणी शब्दांचा वापर केला. गरीब, युवा (तरुण), अन्नदाता (शेतकरी) आणि नारी (महिला) म्हणजे ग्यान, तर गुड गव्हर्नन्स (सुशासन), डेव्हलपमेंट (विकास) व परफॉर्मन्स (कामगिरी) याचा जीडीपी झाला. एफडीआय म्हणजे थेट विदेशी गुंतवणूक.. पण अर्थमंत्र्यांनी फर्स्ट डेव्हलप इंडिया (प्रथम भारताचा विकास) असा नवा अथर्ही बहाल केला. ३-डी म्हणजे डेमोक्रसी (लोकशाही), डेमोग्राफी (लोकसंख्या) आणि डायव्हसिटी (विविधता) असा नवा आयाम यावेळी मिळाला. गेल्या अथर्संकल्पातही मिष्टी, प्रगती, जाम असे परिवणी शब्द वापरण्यात आले होते.

### ३ कोटी महिलांना लखपती दीदी बनवणार



लखपती दीदींना प्रोत्साहन दिला जाणार असून, लखपती दीदी योजनेचा आवाका दोन कोटींवरून तीन कोटींपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ९ कोटी महिलांच्या आयुष्यात बदल झाला आहे. लखपती दीदींमुळे अनेक महिला स्वावलंबी झाल्या आहेत. अंगणवाडी कार्यक्रमांना गती दिली जात आहे. आतापर्यंत एक कोटी महिलांना लखपती दीदी करण्यात आले आहे, असंही केंद्रीय अथर्मंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्यात. केंद्रीय अर्थमंत्री निमर्ला सीतारमण संसदेत अथर्संकल्प सादर करीत आहेत.

अथर्मंत्री निमर्ला सीतारमण म्हणाल्या, गर्भाशयाच्या मुखाचा ककर्रोग रोखण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. यासाठी लसीकरण करण्यात आले आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. मिशन इंद्रधनुषमध्ये लसीकरण वाढवण्यात येणार आहे. नवीन वैद्यकीय महाविद्यालये उघडली जाणार असून, यासाठी समिती स्थापन करण्यात येणार आहे. ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींसाठी मोफत लसीकरण केले जाणार आहे. नॅनो डीएपीचा वापर पिकांवर केला जाईल. दुग्धविकास क्षेत्रात चांगले काम होणार असून, दुग्ध उत्पादकांना प्रोत्साहन दिले जाईल. १३६१ मंडई ेिठीं शी जोडल्या जाणार आहेत. येत्या ५ वर्षांत विकासाची नवी व्याख्या तयार करू. आशा भगिनींनाही आयुष्मान योजनेचा लाभ दिला जाणार आहे. तेलबियांवरील संशोधनाला चालना मिळेल. दर महिन्याला ३०० युनिट वीज मोफत दिली जाणार असल्याच्याही निमर्ला सीतारमण यांनी घोषणा केल्या आहेत.

देशाची अर्थव्यवस्था योग्य दिशेने चालली आहे. आमच्या सरकारचे लक्ष पारदर्शक कारभारावर आहे. अथर्मंत्र्यांनी २० मिनिटे केंद्र सरकारच्या योजनांची गणना केली आणि भारताच्या विकासाच्या गतीवर चर्चा केली. निमर्ला म्हणाल्या की, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पुढील ५ वर्षांत ग्रामीण भागात आणखी दोन कोटी घरे बांधली जाणार आहेत, असंही त्या म्हणाल्यात.

पंतप्रधान जन धन योजनेअंतर्गत आदिवासी समाजापर्यंत पोहोचायचे आहे. खास जमातींसाठी खास योजना आणली आहे. पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळाली आहे. सरकारी योजना लोकांपर्यंत पोहोचत आहेत. सरकार गरिबी हटवण्याचे काम करीत आहे. सरकारने आव्हानांचा धैर्याने सामना केला आहे. ग्रामीण विकासाच्या योजना राबविण्यात आल्या आहेत. पाणी योजनेतून प्रत्येक घरापर्यंत पाणीपुरवठा केला जात आहे. ७८ लाख पथारी व्यावसायिकांना मदत देण्यात आली आहे. शेतकऱ्यांना सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे. ४ कोटी शेतकऱ्यांना पीएम पीक विमा योजनेचा लाभ देण्यात आला आहे. पंतप्रधान किसान योजनेतून ११.८ कोटी लोकांना आर्थिक मदत मिळाली आहे. सवर्सामान्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तरुणांच्या सक्षमीकरणावरही काम केले जात आहे. तीन हजार नवीन आयटीआय उघडण्यात आल्या आहेत. ५४ लाख तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय तरुणांनी घवघवीत यश संपादन केले आहे. तिहेरी तलाक बेकायदेशीर घोषित करण्यात आला आहे. संसदेत महिलांना आरक्षण देण्यासाठी कायदा आणला असल्याचंही निमर्ला सीतारमण यांनी अधोरेखित केलंय.

### नियमित करदात्यांसाठी दिलासादायक घोषणा

केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अथर्संकल्पात केलेल्या घोषणेनुसार गेल्या काही वर्षांत जुन्या वादात अडकलेल्या प्राप्तिकराच्या मागणी प्रकरणांची संख्या वाढली होती. यामुळे अनेक करदात्यांना या वादाचा फटका बसत होता. मात्र, आता अथर्संकल्पात ही घोषणा करण्यात आल्यामुळे २०१० सालापर्यंतच्या प्रकरणांमध्ये ज्यांची २५ हजार रुपयांपर्यंतची करमागणी प्रकरणे वादात होती, ती निर्लेखित करण्यात आली आहेत. अर्थात, आता अशा करदात्यांना हा करभरणा करण्याची आवश्यकता राहिली नाही. त्याचबरोबर २०१० ते २०१४ सालापर्यंत ज्यांची १० हजार रुपयांपर्यंतची करमागणी प्रकरणे वादात होती, त्यांना या रकमेचा करभरणा करण्याची आवश्यकता राहिली नाही.

### ग्राहकांना धक्का! सोनं महागलं

१० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याची किंमत आज रुपये ६२,६८० असून मागील ट्रेडमध्ये ह्या मौल्यवान धातूची किंमत ६२,४८० रुपये प्रति १० ग्रॅमवर बंद झाली होती. बुलियन मार्केट या वेबसाइटनुसार, चांदी ७२,२९० रुपये प्रति किलोने विकली जात आहे. मागील ट्रेडमध्ये चांदीची किंमत ७२,५३० रुपये प्रतिकिलो होती. उत्पादन शुल्क, राज्य कर आणि मेकिंग शुल्कामुळे सोन्याच्या दागिन्यांच्या किमती भारतभर बदलतात.

बुलियन मार्केट वेबसाईटनुसार, मुंबईमध्ये २२ कॅरेट सोन्याची किंमत प्रति १० ग्रॅम ५७,३४७ रुपये आहे. मुंबईत २४ कॅरेट सोन्याची किंमत ६२,५७० प्रति १० ग्रॅम आहे. पुण्यात प्रति १० ग्रॅम २२ कॅरेट सोन्याचा दर ५७,३४७ असेल तर २४ कॅरेट सोन्याचा दर ६२,५७० रुपये असेल. नागपूर मध्ये प्रति १० ग्रॅम २२ कॅरेट सोन्याचा दर ५७,३४७ तर २४ कॅरेट सोन्याचा दर ६२,५७० रुपये इतका असेल. नाशिकमध्ये २२ कॅरेट सोन्याचा दर ५७,३४७ आहे तर प्रति १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा दर ६२,५७० रुपये आहे.

(वरील सोन्याचे दर सूचक आहेत आणि त्यात जीएसटी, टीसीएस आणि इतर करांचा समावेश नाही. अचूक दरांसाठी तुमच्या स्थानिक ज्वेलरशी संपर्क साधा.)

## अत्यंत निराशाजनक आणि पूर्णपणे विसरता येणारा अर्थसंकल्प – पृथ्वीराज चव्हाण



***कराड :*** *देशाचा अथर्संकल्प आज संसदेत अथर्मंत्री निमर्ला सीतारमण यांनी जाहीर केला. या अथर्संकल्पाबाबत प्रतिक्रिया देताना राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय मंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी खोचक टीका करताना म्हणाले की, सादर केलेला अथर्संकल्प हा अत्यंत निराशाजनक आणि पूर्णपणे विसरता येणारा अथर्संकल्प म्हणावा लागेल हि प्रतिक्रिया विरोधक आहोत म्हणून देत नाही तर केंद्रातील भाजप सरकारने कायमच २०२५ पर्यंत आम्ही काय करू, २०४७ चे आमचे उद्दिष्ट काय असणार आहे तसेच जागतिक क्रमवारीत आम्ही आता किती स्थानावर आहोत आणि किती स्थानावर पोचणार अशा अगदी गोलंडोल घोषणा कायमच केल्या आहेत पण प्रत्यक्षात त्यामधले कोणतेही आश्वासन पूर्ण होताना दिसलेले नाही.*

आज अथर्मंत्र्यांनी त्यांच्या भाषणात मोदी सरकारच्या १० वर्षांची आणि डॉ. मनमोहन सिंह यांच्या कायर्काळातील 10 वर्षांच्या कालावधीशी तुलना करून श्वेतपत्रिका काढण्याचे आश्वासन दिले आहे. मला वाटते ही एक स्वागतार्ह घोषणा आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, स्विस बँकेतील काळा पैसा आणू आणि प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये देणे किंवा दरवषी दोन कोटी नवीन रोजगार निर्माण करणे यासारख्या निवडणुकीपूवी दिलेल्या आश्वासनांचे काय झाले हे सरकार त्यांच्या श्वेतपत्रिकेत मांडेल अशी मला आशा आहे. सरकारने अचानक लादलेल्या नोटबंदी निणर्याचे फायदे आणि तोटे देखील स्पष्टपणे स्पष्ट केले पाहिजेत तसेच या निणर्याची अर्थव्यवस्थेला काय किंमत मोजावी लागली. नोटबंदी करताना पंतप्रधानांनी जी उद्दिष्ट्ये सांगितली होती, दहशतवाद, काळापैसा, भ्रष्टाचार संपवणे ही प्राथमिक उद्दिष्टे साध्य झाली का? अन ती जर उद्दिष्ट्ये साध्य झाली नाहीत तर केलेली नोटबंदी नक्की कोणाच्या फायद्यासाठी होती हे सुद्धा शेतपत्रिकेत नमूद असेल अशी आशा आहे. श्वेतपत्रिकेत एमएसएमई क्षेत्र आणि लहान व्यापाऱ्यांवर जीएसटीच्या अंमलबजावणीचा परिणामदेखील सूचित केला पाहिजे किंवा कोविड महामारीच्या काळात अचानक लॉकडाउन लादण्याच्या निणर्याच्या मानवी किंमतीबद्दल देखील बोलले पाहिजे. अशी प्रतिक्रिया देत पृथ्वीराज चव्हाण म्हणाले कि, २०४७ पर्यंत भारत एक विकसित देश होण्याचा आकांक्षी नारा. त्यातील महत्वाकांक्षा बद्दल कोणीही आक्षेप घेणार नाही. परंतु याबद्दल कोणताही रोडमॅप नाही. आम्ही विकसित अर्थव्यवस्थेच्या स्थितीपर्यंत पोहोचण्याचे लक्ष्य २०२४ पर्यंत साध्य करू का, म्हणजे दरडोई जीडीपी पातळी सुमारे $१५,००० आपली अर्थव्यवस्थेच्या जीडीपीच्या सध्याच्या ६.५% वार्षिक वाढीच्या दराने वाढ केल्यास २०४७ पर्यंत आपण हे उद्दिष्ट साध्य होणार नाही. त्याकरिता आपला विकासदर ८-९% वाढला पाहिजे. सरकार एफडीआय मध्ये वाढ झाल्याबद्दल बोलत आहे, परंतु जीडीपीच्या टक्केवारीच्या प्रमाणात एफडीआय स्थिरआहे. बेरोजगारी किंवा शेतकरी आत्महत्या यावर एक शब्दही सरकारकडून आला नाही. सरकार भौतिक पायाभूत सुविधांवर मोठा खर्च करत असेल तरी, त्यांनी सॉफ्ट इन्फ्रास्ट्रक्चर आणि सामाजिक पायाभूत सुविधांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. आरोग्य आणि शिक्षणावर होणारा खर्च तुटपुंजा आहे. नवीन रुग्णालयांचे आश्वासन दिले जात असताना, जुन्या रुग्णालयांमध्ये वैद्यकीय कमर्चारी नाहीत. नवीन डॉक्टर किंवा परिचारिकांची भरती केली जात नाही. आपल्या उच्चशिक्षणाचा दर्जा दयनीय आहे. आपण गुणवत्तेवर नाहीतर फक्त आकड्यांवर लक्ष केंद्रित करत आहोत. संशोधन आणि विकासावरील खर्च कमी होत आहे. आपण चीन, अमेरिका, इस्त्रायल किंवा दक्षिण कोरियाच्या कितीतरी मागे आहोत. याकडे लक्ष देण्याचा प्रयत्न नाही. भारत ही जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था झाली असून लवकरच ती तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनल्याबद्दल सरकार बोलत आहे. हे स्वागतार्ह असले तरी दरडोई जीडीपी बद्दल कोणीही बोलत नाही, जिथे भारत जगात १४२ व्या क्रमांकावर आहे. ८० कोटींहून अधिक लोकांना जगण्यासाठी मोफत रेशन द्यावे लागले. कुपोषणावर एकही शब्द नाही त्यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस सतत बिघडत आहे. याबद्दल कोणतीही आशादायी घोषणा सरकारकडून अथर्संकल्पात होताना दिसली नाही.

## अर्थसंकल्पापूर्वीच बाजार घसरला

### तोट्यात सुरू झाला, पेटीएमचा स्टॉक उघडताच कोसळला

जागतिक दबावाच्या पाश्वर्भूमीवर अथर्संकल्पाच्या दिवशी देशांतर्गत बाजाराने सावध सुरुवात केली आहे. सेन्सेक्स आणि निफ्टीची सुरुवात जवळपास स्थिर झाली आहे. आज अथर्मंत्री निमर्ला सीतारामण लोकसभेत नवा अथर्संकल्प सादर करणार आहेत. त्यापूवीच आरबीआयच्या कारवाईनंतर पेटीएमचे शेअर्स उघडताच कोसळले आहेत.

सेन्सेक्सने अवघ्या २५ अंकांच्या वाढीसह व्यवहाराला सुरुवात केली. निफ्टीचीही अशीच सुरुवात झाली. काही मिनिटांसाठी बाजार लाल रंगात पाहायला मिळाला. सुरुवातीच्या व्यवहारात बाजारात मर्यादित चढउतार दाखवत आहेत. सकाळी ९.२० वाजता सेन्सेक्स १० अंकांच्या किंचित वाढीसह ७१,७५० अंकांच्या जवळ होता. निफ्टी २१,७३० अंकांच्या जवळपास स्थिर होता.

**प्री ओपनमध्ये बाजार मजबूत राहिला**

बाजार उघडण्यापूवी गिफ्टी सिटीमधील निफ्टी फ्युचर्स २१,८०० अंकांच्या पातळीजवळ ग्रीन झोनमध्ये किंचित वाढीसह व्यवहार करीत होते. अथर्संकल्पाच्या दिवशी देशांतर्गत बाजार चांगली सुरुवात करू शकेल, असे संकेत यावरून मिळत होते. प्री ओपन सत्रात बीएसई सेन्सेक्सने ३१५ हून अधिक अंकांच्या वाढीसह ७२ हजारांचा टप्पा ओलांडला होता. निफ्टी ५० पेक्षा जास्त अंकांच्या वाढीसह २१,७८० अंकांच्या वर होता.

अथर्संकल्पाच्या एक दिवस आधी सुरुवातीच्या घसरणीनंतर बाजाराने शानदार रिकव्हरी केली होती. बुधवारी व्यवहार संपल्यानंतर बीएसई सेन्सेक्स ६१२.२१ अंकांच्या (०.८६ टक्के) वाढीसह ७१,७५२.११ अंकांवर बंद झाला. तर ठरए चा निफ्टी ५० काल २०३.६० अंकांनी म्हणजेच ०.९५ टक्क्यांनी मजबूत होऊन २१,७२५.७० अंकांवर होता.

**पेटीएमचे शेअर्स ओपन होताच कोसळले**

आजच्या व्यवहारात गुंतवणूकदारांची नजर पेटीएमची मूळ कंपनी डल्ली97 कम्युनिकेशन्सच्या शेअर्सवर आहे. बुधवारी बाजार बंद झाल्यानंतर रिझर्व्ह बँकेने डल्ली97 कम्युनिकेशन्सची उपकंपनी असलेल्या पेटीएम पेमेंट्स बँकेविरुद्ध मोठी कारवाई केली. पेटीएम पेमेंट्स बँकेला नवीन ग्राहक जोडण्यास किंवा नवीन क्रेडिट देण्यावर तात्काळ बंदी घालण्यात आली आहे. २९ फेब्रुवारीनंतर पेटीएम वॉलेट आणि पेटीएम फास्टॅग यांसारख्या सेवांमध्ये पैसे जोडले जाणार नाहीत. यामुळे आज बाजार उघडताच पेटीएमचे शेअर्स २० टक्क्यांच्या लोअर सर्किटसह ६०९ रुपयांपर्यंत घसरले. पेटीएमच्या शेअर्समध्ये मोठी विक्री होत आहे.

अथर्संकल्पापूवी व्यापक बाजाराची स्थिती संमिश्र दिसते. सेन्सेक्सवर ३० पैकी १८ समभाग ग्रीन झोनमध्ये उघडले, तर १२ समभाग नुकसानासह लाल रंगात उघडले. बड्या समभागांमध्ये मारुती सुझुकीने सर्वात जास्त दीड टक्क्यांच्या वाढीसह सुरुवात केली. महिंद्रा अँड महिंद्रा आणि पॉवर ग्रिडदेखील प्रत्येकी १ टक्क्यापेक्षा जास्त नफ्यात होते. रिलायन्स, टीसीएस, इन्फोसिस यांसारखे मोठे समभागही ग्रीन झोनमध्ये होते. दुसरीकडे एल अँड टी, विप्रो, बजाज फिनसर्व्ह, टायटन यांसारखे शेअर्स तोट्यात होते.

परदेशी बाजारांची स्थिती सध्या चांगली नाही. अमेरिकन सेंट्रल बँक फेडरल रिझर्व्हने व्याजदर स्थिर ठेवण्याच्या निणर्यामुळे जागतिक बाजारात निराशेचे वातावरण आहे. बुधवारी अमेरिकन शेअर बाजारात घसरण झाली. वॉल स्ट्रीटवर, डाऊ जोन्स औद्योगिक सरासरी ०.८२ टक्क्यांनी घसरली. तसेच ठंर्ीं० कंपोझिट इंडेक्समध्ये २.२३ टक्के आणि र&द५०० मध्ये १.६१ टक्के मोठी घसरण दिसून आली. आजच्या व्यवहारात आशियाई बाजारावरही दबाव दिसून येत आहे. सुरुवातीच्या व्यापारात जपानचा निक्केई ०.७२ टक्क्यांनी घसरला. दक्षिण कोरियाच्या कोस्पीमध्ये किंचित वाढ झाली आहे. हाँगकाँगचा हँग सेंग भविष्यातील व्यापारात जोरदार सुरुवात होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# .....विकासदराचा समतोल गरजेचा!




**डॉ. अजित रानडे**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत लेखाअनुदान मांडले. सलग सहाव्यांदा अर्थसंकल्प मांडण्याचा तसेच नवीन संसदेत पहिल्यांदाच अर्थसंकल्प मांडण्याचा मान त्यांना मिळाला. लोकसभा निवडणुकीच्या आधीचा अर्थसंकल्प असल्याने त्यात अनेक लोकप्रिय घोषणांचा समावेश असेल अशी अपेक्षा होती. परंतु त्याला मुरड घालत विकासदरातील सातत्य, महागाई आणि वित्तीय तुटीवर नियंत्रण राखण्याचे संतुलन त्यांनी साधले, असे म्हणता येईल. मतदारांना लक्ष्य करून काही खिरापतींच्या उधळणीच्या वित्तीय साहस करण्याची सरकारला गरज भासली नाही असे आपण म्हणू शकू. याबाबत आपला इतिहास तसा फारसा कौतुकास्पद नाही. यूपीआय-१ सरकारने देशव्यापी कृषी कजर्माफीची घोषणा निवडणुकांच्या तोंडावर मतपेटीच्या राजकारणातूनच केली होती, हे विसरता येणार नाही. पण विद्यमान सरकारचा वित्तीय विवेक ढळल्याचे दिसत नाही. विशेषतः देशावरील कर्जाचे सकल राष्ट्रीय उत्पादन अर्थात जीडीपीशी गुणोत्तर ८२ टक्क्यांच्या शोचनीय पातळीवर गेले असताना आणि खर्चाला आवर घालून तूट नियंत्रणात न आणल्यास हे प्रमाण १०० टक्क्यांची पातळीही गाठू शकते अशा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) दिलेल्या इशाऱ्यानंतर हा तोल राखला जाणे स्वागतार्हच.

करोना महासाथीनंतर जगभरात अनेक वित्तीय, भू-राजकीय आणि तंत्रज्ञानात्मक फेरबदल झाले. यामधील सर्वात महत्त्वाचा वित्तीय बदल म्हणजे देशाच्या कर्जाचे जीडीपीशी वाढलेले गुणोत्तर. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये हे प्रमाण सुमारे ८२ टक्के होते. करोना महामारीनंतर अर्थव्यवस्था सावरण्यासाठी अनेक देशात दिले गेलेले विशेष आर्थिक पॅकेज, पायाभूत सोयी-सुविधांवरील वाढलेला खर्च तसेच रशिया-युक्रेन युद्ध, इस्त्रायल-पॅलेस्टाईन युद्धांमुळे जगभरात निर्माण झालेली अनिश्चितता, खनिज तेलाच्या भावातील चढ-उतार या कारणास्तव कर्जाचा बोजा वाढतच गेला. काही महिन्यापूवीच आंतरराष्ट्रएय नाणेनिधीने भारतीय अर्थव्यवस्थेतील कर्जाचे वाढते प्रमाण यावर चिंता व्यक्त करताना, २०२८-२९ पर्यंत कर्जाचे जीडीपीशी असलेले गुणोत्तर १०० टक्के किंवा त्याहून अधिक होईल असे भाकीत वर्तवले आहे. हे लक्षात घेता मागील दोन वर्षांत टप्प्याटप्प्याने वित्तीय तूट कमी करण्यासाठी राबविण्यात आलेली धोरणे निश्चितच आश्वासक आहेत. २०२१ साली ९.५ टक्के असलेली वित्तीय तूट २०२५ पर्यंत ५.१ टक्के आणि २०२६ पर्यंत ४.५ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचे उद्दिष्ट साध्य होईल अशी आशा आहे. शिस्तबद्ध पद्धतीने आणि नियोजनपूर्वक वित्तीय तूट नियंत्रणात आणल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाच्या पतमानांकनात सुधारणा होईल, महागाई नियंत्रणात येण्यास मदत होईल तसेच विकासदर वाढीला पोषक वातावरण निर्माण होईल.

कोणत्याही देशात आर्थिक विकासदर वाढीसाठी चार मुख्य घटक असतात. शासकीय खर्च, खासगी गुंतवणूक, ग्राहकांची क्रयशक्ती आणि निर्यात. मागील काही वर्षांचा आढावा घेतल्यास भारताचा विकासदर हा प्रामुख्याने शासकीय खर्चावर मोठया प्रमाणात अवलंबून आणि निगडित असल्याचे दिसून येते. रस्ते, रेल्वे, मेट्रो, मोठे सिंचन प्रकल्प अशा भांडवल-सघन प्रकल्पांवर होणाऱ्या खर्चामुळे विकासदरात वाढ होत असली तरी ती वाढ शाश्वत नक्कीच नाही. गेल्या तीन वर्षांत सरकारचा भांडवली खर्च दरसाल ३१ टक्के दराने वाढत आला आहे. सुदैवाने आगामी आर्थिक वर्षासाठी हे वाढीचे प्रमाण १७ टक्केच राहणार आहे. केवळ सरकारसमर्थिक भांडवली खर्चातील विस्तारातून विकासदरात शाश्वत वाढ शक्य नाही. दुसऱ्या बाजूला खासगी गुंतवणुकीचे प्रमाण स्थिर राहिले असून ग्राहकांच्या क्रयशक्तीतसुद्धा फारशी वाढ झालेली नाही. जगभरातील व्यापार आणि आर्थिक धोरणांचा प्रवास उदारमतवादाकडून संरक्षणवादाकडे होत आहे त्यामुळे निर्यात क्षेत्रातदेखील वाढीबाबत आपसूकच मर्यादा निर्माण झाल्या आहेत.

विकासदराला सर्वसमावेशक रूप येण्यासाठी खासगी गुंतवणुकीला चालना देणे, अशा गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण निर्माण करणे, योग्य शासकीय नियमनाद्वारे निकोप स्पर्धा असलेली बाजारपेठ निर्माण करणे, व्याजदर नियंत्रित ठेवणे यासंबंधित उपाययोजनांवर अधिक भर देणे गरजेचे आहे. तसेच ग्राहकांची क्रयशक्ती वाढण्यासाठी महागाई नियंत्रण करणे आणि रोजगार निमितीला चालना देणे क्रमप्राप्त आहे, तर निर्यात वाढीसाठी भारतीय उत्पादनांची गुणवता आणि स्पर्धात्मकता कशी वाढवता येईल यावर अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

रस्ते, विमानतळ, बंदरे, सिंचन प्रकल्प आणि इतर पायाभूत सोयी-सुविधांच्या खर्चावर आणि गुणवत्तेत वाढ झाली असतानाच दुसऱ्या बाजूला शिक्षण आणि आरोग्य अशा मूलभूत सोयींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. नुकत्याच प्रकाशित झालेल्या प्रथम संस्थेच्या ह्यअसर अहवालाह्लतून अनेक धक्कादायक निष्कर्ष समोर आले आहेत. दर्जेदार शिक्षकांचा अभाव, पायाभूत सुविधांची कमतरता, निकृष्ट अध्यापन कौशल्य, पालकांचे वैयक्तिक लक्ष नसणे, आर्थिक-सांस्कृतिक पाश्वर्भूमीमुळे गळतीचे चिंताजनक प्रमाण अशा अनेक कारणांमुळे १२वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना प्राथमिक शाळेत शिकवली गेलेली आकडेमोडही न येणे, भाषा विषयात गती कमी असणे ही निरीक्षणे नोंदवली आहेत. शिक्षण क्षेत्रात अर्थसंकल्पीय तरतुदीचे प्रमाण आजही सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या दोन टक्क्यांपेक्षा जास्त नाही. अशा स्थितीत दर्जेदार ह्यशिक्षणह्ल नाही. म्हणून दर्जेदार ह्यशिक्षकह्ल निर्माण होत नाहीत आणि दर्जेदार शिक्षक नाहीत म्हणून दर्जेदार शिक्षण नाही, या दुष्टचक्रात आजची शिक्षण व्यवस्था अडकली आहे. हे चित्र बदलण्यासाठी ह्यमिशन मोडह्लवर शालेय तसेच उच्चशिक्षणात शासनाने गुंतवणूक करणे अगत्याचे आहे. अर्थव्यवस्थेचा आकार पाच ट्रिलियन, १० ट्रिलियन अथवा त्याहून अधिक होईल. परंतु तो टिकवण्यासाठी शिक्षणात आणि आरोग्य क्षेत्रात शासनाने नियोजनपूर्वक गुंतवणूक करून दर्जा टिकवणे आवश्यक आहे.

भारत एक विकसनशील देश असल्याने सरकारच्या कमाईपेक्षा खर्चाचे पारडे जड राहणे स्वाभाविकच. दोहोंतील अंतर अर्थात वित्तीय तूट त्यामुळे कायम राखली जाईल. परंतु जास्त भांडवली खर्च आणि कमी महसुली व्यय असे संतुलन राहील यावर कटाक्ष असावा. भांडवली खर्चातही मानवी भांडवलावर, म्हणजेच आरोग्य आणि शिक्षणावर जास्त भर दिला जायला हवा. दीघर्कालीन शाश्वत विकासासाठी हाच मंत्र सर्वाधिक फायदा देणारा ठरेल.


लेखक अर्थतज्ज्ञ आहेत

# देशात नीतिशून्य पक्षाची सत्ता!

## शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे भाजपवर टीकास्त्र

**अलिबाग :** नीतिशून्य, विचारशून्य पक्ष गेली दहा वर्षे आपल्या देशावर राज्य करतो आहे. याची मला लाज वाटते आहे. त्यामुळे यापुढे असे होता कामा नये असे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना केले. ते अलिबाग तालुक्यातील चौल येथे जनसंवाद मेळाव्यात बोलत होते.

लोकसभा निवडणुकीच्या पाश्वर्भूमीवर उद्धव ठाकरे यांनी रायगड जिल्ह्याच्या दोनदिवसीय जनसंवाद दौऱ्याला गुरुवारपासून सुरुवात केली. पहिल्या दिवशी त्यांनी पेण, अलिबाग आणि रोहा तालुक्यात जनसंवाद मेळावे घेतले. भगव्याला लागलेला कलंक पुसण्यासाठी कामाला लागण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले. यावेळी शिवसेना नेते मिलिंद नार्वेकर, माजी खासदार अनंत गिते, जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, उपस्थित होते.



तोडा फोडा आणि झोडा ही भाजपची निती आहे. जातीपातीत भांडणे लावायची, समाजात तेढ निर्माण करायची, हिंदू मुस्लिम दंगे निर्माण करायचे आणि आपल्या राजकीय पोळ्या शेकायच्या हा कार्यक्रम सुरू आहे. त्यामुळे लोकांनी सतर्क करणे गरजेचे आहे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. भाजप ही भेकड आणि बेडूक जनता पाटी आहे. या पक्षातून त्या पक्षात जाणारे, कर्तुत्व नसलेले सर्व जण या पक्षात सहभागी झाले आहेत. भाजपमध्ये ना नेते जन्माला आले ना आदर्श त्यामुळे इतर पक्षांतील नेते आणि आदर्श चोरायचे काम भाजपकडून सुरू असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला.

फडणवीस यांना टोला अडीच वर्ष मुख्यमंत्रीपदाची अट भाजपने त्यावेळी मान्य केली असती तर आज जो चोर बाजार मांडला आहे. तो मांडायची वेळ आली नसती. युती सरकारच्या काळात देवेंद्र फडणवीस पाच वर्षे मुख्यमंत्री होते. निवडणुकीनंतर त्याच्यावर अडीच वर्ष विरोधी पक्ष नेते होण्याची वेळ आली. घरफोडीनंतर ते मुख्यमंत्री होतील अशी अपेक्षा होती. पण त्यांना अर्ध उपमुख्यमंत्रीपद दिले गेले. आता पाव उपमुख्यमंत्री झाले असल्याचा टोला ठाकरे यांनी यावेळी लगावला.

# मोरगिरी –मुंबई एस.टी बस सुरु करा

## शिवसेनेचे पाटण आगारप्रमुखांना निवेदन

**पाटण / संजय कांबळे**

मुंबईस्थित पाटण तालुक्यातील सवर्सामान्य चाकरमानी प्रवासी यांच्या सोईसाठी मोरणा विभागातील मोरगिरी येथुन मोरगिरी - मुंबई एसटी बस सेवा दररोज सकाळी सुरू करण्यात यावी.

अशा आशयाचे निवेदन शिवसेना (ठाकरे) गटाच्या वतीने पाटण आगार व्यवस्थापक दयानंद पाटील यांना देण्यात आले.

सदर एसटी बस ही मोरगिरी, वाडी कोतवडे, कुसरूंड, गव्हाणवाडी, सुयर्वंशीवाडी, पापर्डे, मारुलफाटामार्गे सोनाईचीवाडी नावडी, निसरे निसरेफाटा व उरुल मार्गे उंब्रज ते मुंबई अशा मार्गावर धावणार असून सदर एसटी बस सेवेमुळे मोरणा विभागातील सर्व गावे व मरळी विभागातील गावांसह मारुलहवेली विभागांतर्गत बहुले गारवडे सह बऱ्याच गावांना लाभ होणार आहे.



या एसटी बस सेवेमुळे ग्रामीण भाग मुंबईला जोडला जाणार असल्याने सदर एसटी बस साठीची मागणी ही प्रवासीवर्गातुन बरेच दिवस करण्यात आली आहे.

यासाठी उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पाटण तालुका यांच्या वतीने शिवसेना उपतालुकाप्रमुख . भरत पवार, संजय पवार व विभागप्रमुख संतोष साळुंखे यांनी आगार प्रमुखांना वरिल निवेदन दिले.

# माजी सैनिक विलास रभाजी खंडागळे यांनी मराठा समाजाच्या आंदोलनासाठी केला आगळावेगळा उपक्रम

**वळती / सुनिल भोर**

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लाखोच्या संख्येने जरांगे पाटलांच्या आंदोलनाला भरभरून पाठिंबा दिला . या आंदोलनाला दानशुर लोकांचे मोठे योगदान लाभले . तसेच आंदोलनाला यश मिळावे म्हणुन देवाला अभिषेक सुद्धा केले .

मांजरवाडी (ता.जुन्नर ) येथील माऊली प्रतिष्ठानचे सदस्य व माजी सैनिक विलास रभाजी खंडागळे या कुटुंबाने मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी केलेल्या आंदोलनाला यश मिळावे तसेच सरकारने मराठा समाजाच्या मागण्या मान्य कराव्या .सात महिने आंदोलन करूनही सरकार झोपेचे सोंग घेत आहे सरकारला जाग यावी यासाठी खंडागळे यांनी कुटुंबासमवेत रांजणी ( ता. आंबेगांव ) येथील नृसिंह मंदिरात अभिषेक करून महाआरती केली . खंडागळे यांच्या या उपक्रमाला परिसरातील मराठा समाज बांधवांनी पाठींबा दिला .

तसेच प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी टाकळी - ढोकेश्वर येथील अनाथ आश्रमातील २५० मुलांसाठी दोन वेळच्या जेवणाचा किराणा दिला .

यावेळी विलास खंडागळे , प्रमोदिनी खंडागळे , नागेश खंडागळे , लतिका खंडागळे , नेहा खंडागळे आदी कुटुंबातील सदस्य त्यांच्या समवेत होते .

# राज्य मागासवर्ग आयोग सर्वेक्षण, बाबोव...!!

मराठा समाजाला आरक्षण मिळण्याकरता त्या समाजाचे सामाजिक व आर्थिक मागासलेपण सिद्ध करावे लागेल असा भला थोरला अडसर सर्वोच्च न्यायालयाने घालून ठेवलेला आहे. या अगोदर मराठा आरक्षणासंदर्भात दोन प्रयत्न झाले आहेत एकदा उच्च न्यायालयाने आरक्षण नाकारले दुसऱ्यांदा १०२ वी घटना दुरुस्तीअन्वये राज्यसरकारचे अधिकार काढून घेतले असताना पुन्हा फडणवीस सरकारने प्रयत्न केला तोही सर्वोच्च न्यायालयात फोल ठरला. इंद्रा सहानी खटला यासाठी दिशादर्शक आहे, अपवादात्मक परिस्थिती सिद्ध करण्यास सरकारला अपयश आले, सर्व काही स्पष्ट असताना एवढ्या मोठ्या समाजाच्या भावनांचा खेळ का मांडला जातोय? आता काय तर सर्वोच्च न्यायालय टिकणारं आरक्षण देणार त्यासाठी सामाजिक व आर्थिक मागालेपण सिद्ध करण्यासाठी सध्या गावोगावी मागासवर्ग आयोगाचे सर्वेक्षण चालू आहे, त्यातील माहिती व प्रश्नावली पाहिली तर सामाजिक व आर्थिक मागासलेपण सिद्ध न होता ते आरक्षण निश्चितपणाने नाकारले जाईल असे वाटते. व्हाट्सअप विद्यापीठाने सामान्यांच्या डोक्याची मंडई करून टाकली आहे हे वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही. परवापर्यंत मराठा आरक्षणाच्या भावनेने अत्युच्च टोक गाठले, करोडोंच्या संख्येने मराठा समाज श्री मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या वेशीवर एकवटला, संघर्षयोध्याचा हेतू उदात्त असला तरी सरकारने मात्र आंदोलनकर्त्यांना वाटाण्याच्या अक्षदा लावल्या असल्याच्या भावना अनेक तज्ञांनी व्यक्त केल्या आहेत. जाणीवपूर्वक वातावरण निमिती होऊ दिली, वेळ काढूपणा केला, दोन मोठे समाज एकमेकांच्या विरोधात उभे करण्यात सत्ताधाऱ्यांना यश आले. शेवटी अधिसूचना मसूदयाचा कागद श्री जरांगेच्या हातात ठेवला व मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आंदोलनाची सांगता केली. आजपर्यंत नक्की किती कुणबी प्रमाणपत्र सापडली याचा अधिकृत खुलासा सरकार करत नाही, प्रत्यक्ष आरक्षण मिळण्याकरता बरेच अडथळे पार करावे लागणार आहेत. सरकारने हरकतीस मुदत दिली आहे, आरक्षणाला विरोध करणारे कोर्टात जाणार, राज्य मागासवर्ग आयोगाचे काम वेळेत होण्याची शाश्वती नाही, काही दिवसात लोकसभेची आचारसंहिता लागू होईल एकदा निवडणुकीचा ज्वर चढला की या महत्त्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष होणार एका पाठोपाठ एक सर्वच निवडणुका लागणार, मराठा आरक्षण आंदोलनसुद्धा लोकपालच्या मार्गावरून जाईल असे बरेच जाणकार बोलतात. मागासवर्ग सर्वेक्षण अहवालात एकूण १८३ प्रश्न विचारलेले आहेत, पन्नास वर्षांपूवी सर्वेक्षण केलं असतं तर हे प्रश्न योग्य होते अशीच लोकांची सरळ भावना आहे. आजकाल मजूर, घरकाम करणारे झोपडपट्टीत राहणाऱ्यांचा, समाजातील शेवटच्या घटकाचा मनोरंजन साधनं, मोबाईल, पेट्रोल, डिझेल तसेच जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या अनावश्यक गोष्टींचा खर्च काही हजारात आहे. जे समाज पूवीपासून मागासवर्गात आहेत तेसुद्धा ह्या निकषात पात्र होणार नाहीत. संपूर्ण राज्य हागणदारीमुक्त करण्याचा दावा सरकार करतं तरी शौचालया संदर्भात प्रश्न त्या माहितीत विचारला आहे हे एक उदाहरण झालं. त्या प्रश्नावलीत जास्तीत जास्त प्रश्न याच धतीवर आहेत की जे सध्याच्या परिस्थितीला गैरलागू आहेत, स्वातंत्र्यानंतरच्या परिस्थितीशी मेळ खाणारे प्रश्न आता विचारून काय साध्य होणार. जेणेकरून मराठा समाजाचे मागासलेपण सिद्ध होणार नाही असाच ह्या सर्वेक्षणामागचा हेतू वाटतो याची गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे, बरं या सर्वेक्षणाची जबाबदारी ज्या शासकीय कर्मचाऱ्यांच्यावर आहे त्यांच्यात प्रचंड प्रमाणात अनास्था आहे, प्रश्न सोपे असले तरी १८३ म्हणजे अतिरेक आहे, समाज पूर्णपणे संभ्रमात आहे. कमर्चारी नाव, पत्ता, कुटुंबातील संख्या वगैरे जुजबी प्रश्न विचारतात, बाकीची माहिती स्वतःच भरतात ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी भरलेली माहिती ही सरकार धाजीणी असणार हे उघड आहे. सुरुवातीला कर्मचाऱ्यांनी घरी जाऊन काही ठिकाणी माहिती घेतली आता तर रस्त्यावर, गावच्या पारावर माहिती भरण्याचा उद्योग सर्रास चालू आहे, एकप्रकारे ही मराठा समाजाची दिशाभूलच आहे. महाराष्ट्रराज्य इतरांच्या तुलनेत सधन आहे, सर्व जाती धर्मातील, गोरगरीब लोकांचं मजुरांच राहणीमान सुधारलेलं आहे परंतु राज्यातील आरक्षण लाभार्थ्यांचे जीवनमान ज्या पद्धतीने सुधारलेलं आहे त्यामानाने बहुतांश मराठा समाज मागे राहिला त्यांना आरक्षण मिळालं पाहिजे ही गोष्ट खरी आहे.५-१० % मराठा समाज सधन आहे परंतु बहुतांश मराठ्यांना आरक्षणाची गरज आहे त्याचा फायदा नोकरीत, शिक्षणात मिळेल तेव्हा त्यांच्यावर अन्याय होत असल्याची भावना कमी होईल, तो स्वतःची जात शोधण्याच्या भानगडीत पडणार नाही. शेवटी हे मायबाप सरकार आहे, झोपलेल्याला जागं करणं शक्य आहे , परंतु झोपचं सोंग घेतलेल्याचं काय करणार?



**कल्याण पिसाळ देशमुख**
ओझर्डे.
उपाध्यक्ष
वाई तालुका कॉंग्रेस कमिटी.
फोन - ९८५०४१२९०९

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# मराठा कुणबी आरक्षण इतिहासिक निर्णयाचे पाटण शहरात जल्लोषी स्वागत



**पाटण:संजय कांबळे**

मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली अंतरवाली सराटी ते नवी मुंबई पर्यंत झालेल्या महामोर्चात शनिवार दि.२७ जानेवारीला मराठा कुणबी आरक्षण संदर्भात झालेल्या इतिहासिक निणर्याचे पाटण शहरात जल्लोषी स्वागत करुन मराठा समाजाने छत्रपती शिवाजी महाराज, मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढून साखर वाटप केले. यावेळी पाटण शहरातील व परिसरातील मराठा बांधव उपस्थित होते.

सोमवार दि. २९ जानेवारी रोजी रामापूर पाटण येथून छत्रपती शिवाजी महाराज, मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या प्रतिमेची ट्रक्टर ट्रॉलीतून डीजेच्या तालावर पाटण शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मराठा कुणबी आरक्षण संदर्भात महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या निणर्याचे स्वागत व मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे अभिनंदनपर साखर वाटण्यात आली. हि मिरवणूक झेंडा चौक ते लायब्ररी चौक येथे येवून या मिरवणूकीचा समारोप करण्यात आला. यावेळी पाटण व परिसरातील पाटण तालुका मराठा क्रांती मोर्चाचे मावळे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सस्टेनॅबिलिटी इनिशिएटिव्हज ट्रस्टच्या वतीने रक्तदान



**पुणे :** पुण्यातील नामवंत मल्टी डिसीप्लिनरी कन्सल्टसी फर्म व्हीके ग्रुपच्या 'सस्टेनॅबिलिटी इनिशिएटिव्हज' ट्रस्टने व्हीके ग्रुपच्या कर्मचाऱ्यांसाठी दीनानाथ मंगेशकर रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबीर आयोजित केले होते. एकूण १०२ रक्तदात्याने रक्तदान केले.या उपक्रमामध्ये स्टडकॉम कन्सल्टसीच्या कर्मचाऱ्नी देखील सहभाग घेतला. हे शिबीर व्हीके ग्रुप कार्यालय, सेनापती बापट रस्ता येथे दि.३१ जानेवारी रोजी पार पडले.

दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलचे सचिन व्यवहारे, डॉ.अश्विनी जोशी, व्हीके ग्रुपचे संस्थापक विश्वास कुलकणी, हृषीकेश कुलकणी, सौ.अपूर्वा कुलकणी, सौ.अनघा परांजपे पुरोहित, स्टडकॉम कन्सल्टसी चे निखिल इनामदार, 'सस्टेनॅबिलिटी इनिशिएटिव्हज 'चे अमोल उंबरजे, 'ग्राफिक्स बियाँड'चे बारिश दाते, दीनानाथ मंगेशकर रक्तपेढीच्या सौ. रुपा बांदल हे उपस्थित होते.

ज्येष्ठ आकिर्टेक्ट विश्वास कुलकणी यांनी 'व्हीके ग्रुप' ची स्थापना केली असून संस्थेच्या वतीने नगरनियोजन,पर्यावरण संवर्धन,शास्वत विकास अशा अनेक विषयांवर चर्चासत्रेही आयोजित केली जातात. मागील वषी ५० व्या वर्षात पदार्पण करत असताना 'व्हीके ग्रुप'ने अनेक सामाजिक उपक्रम करण्याचे योजले होते.दरवषी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याचे 'व्हीके ग्रुप'चा मानस आहे.

# रोटरी क्लब ऑफ पुणे टिळक रोड 'तर्फे शाळांसाठी स्वच्छतागृहांचा प्रकल्प

## ग्लोबल ग्रँट मधून ६५ लाखाचा निधी




पुणेः 'रोटरी क्लब ऑफ पुणे टिळक रोडत'र्फे चार शाळांसाठी स्वच्छतागृहांचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.यासाठी रोटरी क्लब ऑफ स्टिलवॉटर यूएसए आणि रोटरी इंडिया फाऊंडेशन यांच्या ग्लोबल ग्रँट च्या सहाय्याने सुमारे पासष्ट लाखांचा निधी मिळाला आहे.या प्रकल्पासाठी मिळालेल्या अनुदानामध्ये एका वर्षासाठी या स्वच्छतागृहांची देखभाल व आरोग्य प्रशिक्षणाचा खर्च समाविष्ट आहे.

यातून पुण्याजवळील एकूण चार शाळांमध्ये स्वच्छतागृहांचे नूतनीकरण करणे, नवीन स्वच्छतागृह बांधणे आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा बसवणे असा उपक्रम क्लबचे अध्यक्ष गिरीश ब्रह्मे आणि ग्लोबल ग्रांट्स डायरेक्टर दिलीप राईलकर यांच्या नेतृत्वाखाली व संचालक मंडळाच्या सहकार्याने योजला आहे. ह्या प्रकल्पाचे भूमिपूजन नुकतेच ज्ञानप्रकाश शिक्षण संस्था संचालित व्ही एम आठवले हायस्कूल व ज्ञानप्रकाश शिक्षण संस्था प्राथमिक शाळा( नसरापूर ) आणि जिल्हा परिषद शाळा( वाडा शिवापूर ) येथे करण्यात आले. या उपक्रमाचे नियोजन, प्रफुल्ल पेंढारकर, संजय बापट, प्रसाद कुंभोजकर, मकरंद कुलकणी, देवदत्त हंबडीकर, सत्यजित बडवे, चंद्रकांत डांगे इत्यादी रोटेरियन्सच्या मुख्य टीमने गेल्या काही महिन्यांपासून केले आहे.

या शाळांमध्ये शिकणारे सुमारे १५०० विद्याथी या प्रकल्पांचे लाभाथी असतील. हे तीन प्रकल्प आणि महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बारामती येथील देशपांडे शाळेतील स्वच्छतागृहाचे नूतनीकरण याच निधीतून केले जाईल. येथेही भूमिपूजन रोटरी क्लब ऑफ बारामतीच्या सहकार्याने लवकरच होणार आहे.दि. २६ जानेवारी रोजी नसरापूर आणि वाडा शिवापूर येथील भूमिपूजनासाठी, क्लबचे ४० सदस्य उपस्थित होते. शाळांचे पदाधिकारी व ज्ञानप्रकाश शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.शाम दलाल यांनी सर्व व्यवस्था केली होती.

# मांजरी उपबाजारात खोतीदार यांना अखेर प्रवेश परंतु संचालक मंडळाने लादल्या जाचक अटी

## उपोषणमुळे भिसे यांची प्रकृती खालावली तरी उपोषण चालूच

**हडपसर.:** मांजरी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने अतिशय जाचक अटी लादून खोतीदारांना मांजरी उपबाजारात व्यवसाय करण्यास परवानगी दिली संचालकांच्या या जाचक अटींमुळे खोतीदार व शेतकरी उध्वस्त होणार असून उपोषण करणारे आंदोलक व शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे कारस्थान रचले जात आहे, संचालकाच्या या जुलमी निणर्यास आमचा विरोध असून आमरण उपोषण सुरूच राहणार असल्याचे बाळासाहेब भिसे यांनी सांगितले.

उपोषणाचा सहाव्या दिवशी उपोषणकर्ते भिसे यांची प्रकृती खालावली असताना उपोषणाची दखल न घेता शेतकरी संघटनेला संचालक मंडळाने पत्र दिले आहे.

चार महिन्यापूवी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळांनी मांजरी उपबाजारात खोतीदार व्यापाऱ्यांना मज्जाव केला, त्यांचे परवाने रद्द केले, या विरोधात खोतीदार व शेतकरी यांनी आंदोलन केले तसेच निवेदन देऊन वेळोवेळी पाठपुरावा केला, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनीही संचालक मंडळांना तोडगा काढण्यास सांगितले मात्र संचालकांच्या अंतर्गत



कलहामुळे यामध्ये निर्णय होऊ शकला नाही,

अखेर संचालकांची बैठक झाली अन अटी व शथी टाकून खोतीदारांना मांजरी उपबाजारात प्रवेश देण्याचा निर्णय झाला, या अटी अतिशय जाचक असून यामध्ये हवेली तालुक्यातील माल काढावा, एका दिवशी २००० जुडी आणावी, मदतनीस आणू नये, शेतकऱ्यांची सर्व माहिती कागदपत्रासह कार्यालयात जमा करावी, खोतीबाबत ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर करार करून जमा करावा, वाहनात माल विक्री न करता शेडमध्ये करावा, एक वाजेपर्यंतच माल आणावा, ही तात्पुरती परवानगी असून कोरेगावमूळ येथे खोतीदारांसाठी मार्केट मध्ये स्थलांतर करणार तेव्हा मांजरी बाजारात खोतीदारांना बंद करणार अशा जाचक अटींमुळे पुरंदर, दौंड, हवेली मधील खोतीदार अन शेतकरी उध्वस्त होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

हडपसर पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक दिनेश शिंदे, उमेश शेलार यांनी आंदोलक बाळासाहेब यांची भेट घेतली, आणि उपोषण माघारी घेण्याचे आवाहन केले परंतु संचालक मंडळांनी घातलेल्या जाचक अटी आम्हाला मान्य नाही, कोणत्याही नियम अटी न घालता, खोतीदारांना प्रवेश द्यावा संचालक मंडळाच्या कारभाराची चौकशी व्हावी ही मुख्य मागणी असून मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण आंदोलन सुरूच राहणार अशी भूमिका बाळासाहेब भिसे यांनी घेतली आहे.

संचालक मंडळाचा खोतीदारांवर इतका राग का?

खोतीदार व्यापारी यांचा शेतकऱ्यांना कोणताही त्रास नसताना छोटे शेतकरी मोठे शेतकरी असा वाद निर्माण करून खोतीदारांवर जाचक अटी टाकणाऱ्या संचालक मंडळाला खोतीदारांचा एवढा राग कशासाठी असा प्रश्न निर्माण झाला आहे, केंद्र व राज्य सरकार शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना राबवत असताना संचालक मंडळाच्या आडमुठ्या भूमिकेमुळे तीन तालुक्यातील शेतकरी अडचणीत येणार आहेत.

**खोतीदार मागण्याबाबत पणन संचालकांना पत्र देणार**

उपोषणाचा सहावा दिवस आहे, दरम्यान शिरूर मतदार संघाचे आमदार अशोक पवार यांनी आंदोलन बाळासाहेब भिसे यांची भेट घेतली व सर्व विषय समजून घेतला, या विषयात पणन संचालकांना पत्र देऊन प्रश्न सोडविण्यास पुढाकार घेणार असल्याचे आमदार अशोक पवार यांनी सांगितले.

# हृतिक, रणबीरपासून वरुण धवनपर्यंत! अनिल कपूर या पिढ्यांना फायटर बनण्याची प्रेरणा देते

45 वर्षांच्या कारकिदीसह, मेगास्टार अनिल कपूर हे हिंदी चित्रपटातील कलात्मक तेज आणि लवचिकतेचे प्रतीक आहेत. त्याच्या चिरस्थायी प्रभावाचा पुरावा म्हणून, कपूर आपल्या अतुलनीय कार्य नीतिमत्तेने आणि त्याच्या कलेसाठी अटूट बांधिलकीने अभिनेत्यांच्या तरुण पिढीला प्रेरणा देत आहे. फायटरच्या प्रचारादरम्यान, सहकलाकार हृतिक रोशनने अभिनेता म्हणून त्याच्या प्रवासावर कपूरच्या प्रभावाबद्दल मनापासून श्रद्धांजली वाहिली.

कपूरच्या समपर्णाने दृश्यमानपणे प्रभावित झालेल्या रोशनने सेटवर एक संस्मरणीय क्षण शेअर केला जेव्हा कपूरचे भावनिक चित्रण त्याच्यासोबत अडकले, चार दशकांनंतरही पात्रांमध्ये खोलवर अंतर्भूत करण्याची त्यांची क्षमता अधोरेखित केली. रोशन म्हणाला, ₹मी सिड (सिद्धार्थ आनंद) ला सांगितले की मी देवाला प्राथर्ना करतो की मी माझ्यामध्ये अशी शक्ती टिकवून ठेवू शकेन. अॅनिमल या ब्लॉकबस्टर चित्रपटातील त्यांच्या सहकार्यावर




प्रतिबिंबित करताना, रणबीर कपूरने कपूरच्या संक्रामक उर्जेची प्रशंसा केली आणि या अनुभवाचे वर्णन एक प्रचंड शिकण्याची संधी असल्याचे सांगितले.

त्याच्याकडे सहजतेने भिन्न भिन्नता देण्याची, वेगवेगळ्या भावनांमध्ये बदल करण्याची आणि त्याच्या पात्रांना प्रामाणिकपणाने जिवंत करण्याची अद्वितीय क्षमता आहे. अङ सोबत काम करणे हा एक अनुभव आहे जो मी कधीही विसरणार नाही,₹ तो अनिल कपूरबद्दल म्हणाला. रणवीर सिंग, ज्याने कपूरसोबत दिल धडकने दो मध्ये काम केले होते, त्याला ₹एक दिग्गज कलाकार, एक आख्यायिका आणि हिंदी चित्रपटातील सवोत्कृष्ट व्यक्तींपैकी एक₹ असे संबोधले. वरुण धवनने जुग्जग जीयोमध्ये कपूरसोबत स्क्रीन शेअर केल्यानंतर, त्याला एक संस्था आणि तरुण कलाकारांसाठी आदर्श म्हणून ओळखले. धवनने कपूरची आवड, तंदुरुस्ती आणि दृढनिश्चय या गुणांवर प्रकाश टाकला ज्यामुळे ते इच्छुक कलाकारांसाठी एक अनुकरणीय व्यक्तिमत्व बनतात. अनिल कपूरने मोठ्या पडद्यावर जादू विणणे सुरू ठेवल्याने, त्याचा वारसा पिढ्यांसाठी मार्गदर्शक प्रकाश बनतो, हे दाखवून देतो की उत्कटता, प्रामाणिकपणा आणि समर्पण हे मनोरंजनाच्या सतत विकसित होत असलेल्या जगात कालातीत गुण आहेत.

# 'फना' या नव्या गाण्यातून सनी लिओनी प्रेक्षकांच्या भेटीला

सनी लिओनीच्या ही कायम चर्चेत असलेली अभिनेत्री आहे. फॅशन, व्यवसाय आणि आता डान्सिंग सुपरस्टार असलेली सनी ही ₹ फना ₹ हे नवं व्हिडिओ साँग प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन आली आहे. सनीने तिच्या सोशल मीडियावर हे गाण रिलीज करण्याची घोषणा केली असून पोस्टला कॅप्शन दिल आहे

व्हिडिओमध्ये सशक्त नृत्यदिग्दर्शन आणि सनीची आकर्षक उपस्थिती दिसून येते असून कलात्मक बाजू यातून बघायला मिळते. सनी लिओनी आगामी 'ग्लॅम फेम' शोला जज करणार आहे आणि अनुराग कश्यप दिग्दर्शित 'केनेडी' या राहुल भट्टसोबत तिच्या जागतिक स्तरावर प्रशंसित चित्रपटाची वाट पाहत आहे. 'कोटेशन गँग' या चित्रपटाद्वारे तिच्या तमिळ चित्रपटसृष्टीत प्रवेशाचीही चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत, जिथे ती जॅकी श्रॉफ, प्रियामणी आणि सारा अर्जुनसोबत सामील होते. ती Spiltsvi'' सीझन 5 देखील होस्ट करणार आहे.



# अनंतराव पवार महाविद्यालयात शिक्षणमहर्षी बाबुरावजी घोलप जयंती उत्साहात साजरी



**राजेंद्रकुमार शेळके**

**पुणे :** पिरंगुट ता.मुळशी येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अनंतराव पवार महाविद्यालयात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे संस्थापक व मानद सचिव कै.बाबुरावजी घोलप यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अभय खंडागळे यांनी दिली. घोलपसाहेब यांचा संपूर्ण शैक्षणिक प्रवास महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ.गणेश चौधरी यांनी सर्वाना परिचय करून दिला. प्राचार्य डॉ.अभय खंडागळे यांच्या हस्ते प्रतिमापुजन करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर उप प्राचार्य डॉ.प्रविण चोळके,ग्रंथपाल प्र.अविनाश हुंबरे,जेष्ठ अध्यापिका वैभवी काळे, प्रभारी कार्यालयीन अधीक्षक रवींद्र लाड,शिक्षकेत्तर प्रतिनिधी नितीन शिंदे,निलेश ठोंबरे, श्रीमती.दिपाली पवळे सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कमर्चारीव विद्याथी वर्ग उपस्थित होते.

# मांजरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची हेजर इलेक्ट्रो प्रायव्हेट लिमिटेडला भेट

**राजेंद्रकुमार शेळके**

**पुणे :** पुण्याच्या मांजरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन (ए&ळउ) विभागातील विद्यार्थ्यांना नुकतीच इलेक्ट्रिकल स्विचगियर आणि औद्योगिक नियंत्रणे बनवणारी आघाडीची कंपनी हेजर इलेक्ट्रो प्रायव्हेट लिमिटेडला भेट देण्याची संधी मिळाली. या भेटीचे आयोजन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बीआयएस स्टँडर्ड क्लबने केले होते, ज्याचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना उद्योग आणि त्याच्या कार्यप्रणालीची प्रत्यक्ष ओळख करून देण्याच्या उद्देशाने होते.

हेजर इलेक्ट्रो प्रायव्हेट लिमिटेड ही एक प्रसिद्ध कंपनी आहे ज्याचा इलेक्ट्रिकल उद्योगात 60 वर्षांपेक्षा जास्त अनुभव आहे. कंपनी लघु सर्किट ब्रेकर्स, मोल्डेड केस सर्किट ब्रेकर्स आणि औद्योगिक नियंत्रण पॅनेलसह उत्पादनांची विस्तृत श्रेणी तयार करते. या भेटीत विद्यार्थ्यांना




कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनापर्यंत उत्पादनाचे विविध टप्पे पाहता आले. कंपनीमध्ये असलेल्या विविध गुणवत्ता नियंत्रण उपायांबद्दल देखील जाणून घेतले.

या दौऱ्यानंतर, विद्यार्थ्यांनी हेजर इलेक्ट्रो प्रायव्हेट लिमिटेडमधील काही अभियंत्यांसह प्रश्नोत्तर सत्र केले. अभियंत्यांनी त्यांचे कार्य आणि त्यांना येणाऱ्या आव्हानांबद्दल सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात करिअर करण्यासाठी प्रोत्साहनही दिले. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना उद्योगातील प्रत्यक्ष कामकाजाची अनुभूती आणि ज्ञान मिळाले आहे. यामुळे त्यांच्या सैद्धांतिक ज्ञानाला बळकट मिळेल आणि त्यांना भविष्यातील व्यवसायासाठी तयार करण्यास मदत होईल असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. व्ही. पाटील यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी श्री.श्रीकांत शिरसाट(स्टँडर्ड प्रोमोशन कंसल्टंट) यांच्या मार्गदर्शनाखाली कोरगाव भीमा एम. आय. डी. सी. येथे भेट दिली. दौऱ्यानंतर, विद्यार्थ्यांनी हेजर इलेक्ट्रो प्रायव्हेट लिमिटेडमधील काही अभियंत्यांसह प्रश्नोत्तर सत्र केले. अभियंत्यांनी त्यांचे कार्य आणि त्यांना येणाऱ्या आव्हानांबद्दल सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात करिअर करण्यासाठी प्रोत्साहनही दिले. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना उद्योगातील प्रत्यक्ष कामकाजाची अनुभूती आणि ज्ञान मिळाले आहे. यामुळे त्यांच्या सैद्धांतिक ज्ञानाला बळकट मिळेल आणि त्यांना भविष्यातील व्यवसायासाठी तयार करण्यास मदत होईल असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. व्ही. पाटील यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी श्री.श्रीकांत शिरसाट(स्टँडर्ड प्रोमोशन कंसल्टंट) यांच्या मार्गदर्शनाखाली कोरगाव भीमा एम. आय. डी. सी. येथे भेट दिली. त्याठिकाणी कंपनीचे सिनिअर मॅनेजर श्री. शिरीष झोपे व कंपनीतील विविध अभियंते यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा.संजय गुणारे व श्री.तानाजी नांदे यांनी विद्यार्थ्यासोबत सहभाग घेतला होता. या सर्व भेटीचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागप्रमुख आणि स्टँडर्ड क्लबच्या मेंटॉर प्रा. सौ अनुराधा जाधव यांनी केले होते.

# महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हा !

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटना महामंडळाचा १२ रोजी राज्यस्तरीय मोर्चा

■ सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी संघटना अध्यक्ष अनिल राणे यांचे आवाहन

कोकणसाद वृत्तसेवा

**वेंगुर्ला:** माध्यमिक, उच्च माध्यमिक, अध्यापक विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्या गेल्या कित्येक वर्षापासून मान्य होत नसल्याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांच्या महामंडळाच्या वतीने १२ फेब्रुवारी रोजी पुणे येथे राज्यस्तरीय महामोर्चाचे आयोजन करण्यात आले असून जिल्ह्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी संघटना अध्यक्ष अनिल राणे, सचिव गजानन नानचे व कार्याध्यक्ष प्रदीप सावंत यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे.

महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न गेल्या कित्येक



वर्षापासून प्रलंबित आहेत. सदर प्रश्न तातडीने निकाली काढले जातील असे आश्वासन शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी देऊनही त्याची पूर्तता न झाल्याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटना महामंडळाचे राज्य अध्यक्ष अनिल माने, राज्य सरकार्यवाह शिवाजी खांडेकर, कार्याध्यक्ष मोरेश्वर वासेकर यांच्या नेतृत्वाखाली १२ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी भव्य मोर्चाचे आयोजन पुणे येथील शनिवार वाडा ते शिक्षण संचालक व शिक्षण आयुक्त कार्यालय सेंट्रल बिल्डिंग पुणे येथे करण्यात आले असून राज्यातील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने महामोर्चा काढण्यात येणार आहे तसेच दिनांक २० फेब्रुवारी २०२४ पासून राज्यातील सर्व शिक्षकेतर कर्मचारी काम बंद आंदोलन करतील असा इशारा राज्य महामंडळाच्या वतीने देण्यात आला आहे. ७ जानेवारी रोजी सावंतवाडी येथे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे राज्य अधिवेशन संपन्न झाले. त्यावेळी सदर अधिवेशनात शिक्षण मंत्र्यांनी प्रलंबित प्रश्न सोडविण्याचा दिलेला शब्द पाळला नाही. त्यामुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने मोर्चा काढणार असल्याचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री या संबंधित विभागांना राज्य महामंडळाच्या वतीने देण्यात आले आहे.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या १०/२०/३० च्या लाभाची योजना त्वरित मंजूर करावी, आकृतीबंध संदर्भात नियुक्त केलेल्या समितीने सादर केलेला अहवाल मंजूर करून शिक्षकेतरांच्या भरतीस त्वरित परवानगी मिळावी, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २४ वर्षांचा दुसरा लाभ तात्काळ लागू करण्यात यावा, पदवीधारक ग्रंथपालांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करावी, विद्यार्थी संख्या कमी झाल्यास शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन व वेतन श्रेणी संरक्षण मिळावे, विनाअनुदानित तुकडी वरील विद्यार्थी संख्या शिक्षकेतर पदे मंजूर करताना ग्राह्य धरावी आदी प्रलंबित प्रश्न त्वरित निकाली काढण्यात येतील असे आश्वासन शिक्षण मंत्री यांनी दिले होते परंतु याबाबत शासनाकडून कोणतीही सकारात्मक हालचाल होताना दिसून येत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

शासन स्तरावर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्या संदर्भात शासनाकडून कोणत्याही प्रकारच्या हालचाली होत नसल्याने पुणे येथील शिक्षण संचालक व शिक्षण आयुक्त कार्यालयावर १२ फेब्रुवारी रोजी भव्य मोर्चा काढण्यात येणार असून दिनांक २० फेब्रुवारी पासून राज्यातील सर्व शाळातील शिक्षकेतर कर्मचारी काम बंद आंदोलन करतील तरी जिल्ह्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुणे येथील महामोर्चा मध्ये सहभागी होऊन शाळा बंद आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन सिंधुदुर्ग जिल्हा माध्यमिक उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटनेतर्फे करण्यात आले आहे.



देवगड तहसीलदार यांना निवेदन देताना देवगड तालुका बार असोसिएशनचे पदाधिकारी.

# वकील दाम्पत्याच्या हत्येचा देवगड तालुका बार असो.कडून निषेध

**देवगड** : राहुरी-अहमदनगर येथे वकिली व्यवसाय करणाऱ्या दाम्पत्याच्या निर्घृण हत्येचा देवगड तालुकाबार असोसिएशनच्यावतीने निषेध करण्यात आला. सदर हत्याकांडाचा सखोल तपास होऊन सर्व आरोपींना तात्काळ अटक व्हावी व त्यांच्यावर पुढील कायदेशीर कारवाई लवकरात लवकर व्हावी, अशी सर्व वकील सदस्यांनी निवेदनाव्दारे देवगड तहसीलदार यांच्याकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे.

दिवसेंदिवस राज्यात वकिलांवर हल्ले करणे, धमकाविणे, त्रास देणे असे प्रकार वाढत चालले आहेत. आढावा व वकील दाम्पत्यांच्या झालेल्या निर्घृण हत्येमुळे त्यांची दाहकता अधिक प्रकर्षाने समोर आलेली आहे. यासाठी वकिलांच्या संरक्षणाकरीता ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट तात्काळरीत्या लागू करणे आता अत्यावश्यक बनलेले आहे व सदर कायद्याची तात्काळ अंमलबजावणी सुरु झाल्यास वकिलांच्या मनात निर्माण झालेली भीती दूर होऊन त्यांना व्यवसाय करताना संरक्षणाची हमी मिळणारी आहे. तरी प्रस्तुत वकील संरक्षण कायदा तात्काळ लागू करणेत यावा व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेकरिता आपलेमार्फत महाराष्ट्र शासनास कळविणेत यावे असे निवेदन देवगड तहसीलदार यांना देवगड तालुकाबार असोसिएशनच्यावतीने देण्यात आले.

यावेळी ॲड. देवानंद गोरे, ॲड. सिध्देश आचरेकर, ॲड. गिरीश भिडे, ॲड. श्यामसुंदर जोशी, ॲड. अन्वी कुलकर्णी, ॲड. संगीता कालेकर, ॲड. लिमये, ॲड. लोके, ॲड. खोबरेकर आदी उपस्थित होते.

# स्फोटकसदृश पदार्थ खाल्ल्याने गाय गंभीर जखमी

## अज्ञाताविरुद्ध कुडाळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद

कोकणसाद वृत्तसेवा

**कुडाळ** : घराच्या समोरील वाढवलेल्या गवतात खुंठीला बांधून ठेवलेल्या गायीने जंगली जनावरे मारण्यासाठी गवतात ठेवलेला स्फोटक पदार्थ तोंडात घेऊन चावल्याने त्याचा स्फोट होऊन गायीचा जबडा फुटून त्यात ती जखमी झाली. या प्रकरणी कुडाळ पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद कानोजी पांडुरंग म्हाडदळकर (वय ५६, रा. बांबोळी, नेहरूनगर, धनगरवाडी) यांनी दिली आहे.

कानोजी पांडुरंग म्हाडदळकर यांनी कुडाळ पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत असे म्हटले आहे की, आम्ही शेती व्यवसाय करत असून आमच्याकडे पाळीव जनावरे आहेत त्यात तीन गायी व एक पाडा (वासरु) आहेत. माझी सर्व जनावरे ही सकाळी व संध्याकाळी अशी आमच्या घराच्या कंपाऊडच्या बाहेर जवळपास वाढलेल्या गवतात खुंठी लावून लांब असणाऱ्या दोरीने चरण्यासाठी बांधलेली असतात. हा आमचा नेहमीचा दिनक्रम आहे. २८ जानेवारी रोजी सायंकाळी मी आमची जनावरे त्यात तीन गायी व एक पाडा (वासरु) या घराच्या पाठीमागील जवळपास असलेल्या गवतात खुंठी लावून लांब असणाऱ्या दोरीने बांधून ठेवली असता सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास मोठा आवाज आला. त्यामुळे मी व माझी पत्नी घराबाहेर आलो. व ज्या ठिकाणी गाय व वासरू बांधून ठेवले होते त्या ठिकाणी धाव घेतली असता त्या बांधून ठेवलेली गाय रक्तबंबाळ अवस्थेत दिसली, यावेळी मी असलेल्या गायीच्या तोंडातून रक्त येत होते. आम्ही ताबडतोब गुरांच्या डॉक्टरना फोन केला व पोलीस स्टेशनला फोन करून सर्व घटना सांगितली. गाईला झालेली गंभीर दुखापत ही गायीने स्फोटक पदार्थ तोंडात घेऊन चावल्याने स्फोट होऊन झाली आहे असे गुरांच्या डॉक्टरांनी सागितले. यानंतर कुडाळ पोलीस ठाणेत अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याबाबत कुडाळ पोलीस ठाण्याच्या अंमलदारांकडून माहिती देण्यात आली.

# मुणगे जत्रोत्सवात सप्तसुरांचा संगम!

## शालेय विद्यार्थ्यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध

कोकणसाद वृत्तसेवा

**मसुरे** : संगीतामध्ये सूर, ताल आणि लय याला अतिशय महत्व आहे. संगीत कला ही सर्व कलामध्ये श्रेष्ठ कला मानली जाते. संगीतामधील अशाच सूर, ताल आणि लय याचा अनोखा मिलाफ झाला होता, तो देवगड तालुक्यातील मुणगे ग्रामदेवता श्री भगवती देवालयात! निमित्त होते ते वार्षिक जत्रोत्सवाचे.

मुणगे येथील श्री भगवती हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध भक्तीगीत, भावगीत, गजर सादर करत उपस्थितांची वाहवा मिळवत बक्षिसांची सुद्धा लयलूट केली. कार्यक्रमाचा प्रारंभ 'मी शरण तुला भगवंता' या भक्ती गीताने रिया अरविंद सावंत हिने केला. तर 'माय भवानी तुझे लेकरू' हे गीत चैतन्य रूपे, 'देव देव्हाऱ्यात नाही' हे भक्तीगीत अनुराधा आनंद कदम हिने तर 'देव माझा विठू सावळा' हे गीत समर्थ



शालेय विद्यार्थ्यांसोबत गाताना शिक्षिका. सोबत इतर.

पाडावे यांनी सादर केले. यानंतर 'मंदिरात अंतरात तोच नांदत आहे' हे भक्ती गीत मृगाक्षी मंगेश हिर्लेकर हिने तर स्वामी समर्थ भक्तीने प्रेरित होऊन 'अंतरंगी रंगलेले स्वरूप मी पाहतो' हे गीत दक्षेश गुरूप्रसाद मांजरेकर याने सादर केले. प्रशालेच्या कलाशिक्षिका गौरी तवटे यांनी 'गजानना श्री गणराया' हे भक्ती गीत तर 'आई एकविरा पावली' हे गीत जय सावंत याने सादर केले. 'मुणगे गावची देवी भगवती' हे गीत श्रेयस सावंत, सिद्धेश म्हापणकर यांनी तर 'तूच सुखकर्ता तूच दुखहर्ता' हे गीत देवांग रघुनाथ मेस्त्री याने सादर केले. उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या कार्यक्रमांमध्ये 'मन लागोरे लागोरे माझे गुरु भजनी' हे भक्तीगीत अनन्या राजेश गावकर हिने तर 'हरी ओम स्वामी समर्थ म्हणा' हे गीत रितेश आईर आणि कीर्ती गाजते मुणगे गावच्या आई भगवती देवीची' हा गजर आदेश विनोद सावंत यांनी सादर केला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'अशक्य ही शक्य करतील स्वामी' हा स्वामी मंत्र सिद्धेश म्हापणकर तर 'देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा' हे गीत ईश्वरी सुभाष राणे हिने तर 'अबीर गुलाल उधळीत रंग' हे भक्ती गीत लीनांगी विश्वास मुणगेकर हिने सादर केले. भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली.

सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांचे गुरु प्रसिद्ध भजनी बुवा श्री राजेंद्र प्रभू यांनी सुद्धा 'हेचि दान देगा देवा' ही भैरवी सादर करत कार्यक्रमाला चार चांद लावले. कार्यक्रमासाठी टाळ शशिकांत लब्दे, तबला शैलेश सावंत तर हार्मोनियम साथ भजन सम्राट राजेंद्र प्रभू यांची लाभली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गुरुप्रसाद मांजरेकर, मीताली हिर्लेकर, प्रियंका कासले, सुविधा बोरकर यांचे सहकार्य लाभले. श्री भगवती देवस्थान कमिटीच्या वतीने विद्यार्थी व शिक्षक यांना कल्पवृक्षाचे रोप आणि आई भगवतीचा प्रसाद देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे निवेदन शिक्षिका गौरी तवटे यांनी केले. कार्यक्रम सादर करण्याची संधी दिल्याबद्दल श्री भगवती देवस्थान कमिटीचे यावेळी आभार मानण्यात आले.

## एसपीकेत टेकफेस्ट २०२४ चे आयोजन

**सावंतवाडी** : सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडीत माहिती तंत्रज्ञान व संगणक शास्त्र विभागाच्यावतीने एक दिवसीय टेकफेस्ट २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे.

वेब डेव्हलपमेंट, मोबाईल फोटोग्राफी, मोबाईल व्हिडिओग्राफी, स्टार्टअप प्रेझेंटेशन, ब्लाईंड टायपींग, डेटाबेस मास्टरमाईंड, बॅटलग्राउंड मोबाईल इंडिया या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे आयोजन आयटी विभाग प्रमुख अक्षता गोडकर व संगणक शास्त्र विभाग प्रमुख विभा गवंडे त्याचबरोबर विद्यार्थी प्रतिनिधी आत्माराम तोरसकर व पूजा नाईक यांनी विभागाच्यावतीने केले आहे, तरी या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एल. भारमल यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी आत्माराम तोरसकर 9423760518 पूजा नाईक 7083650704 यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वेंगुर्लेत विश्वकर्मा लाभार्थी नोंदणी शिबिराचा प्रारंभ

कोकणसाद वृत्तसेवा

**वेंगुर्ले** : प्रधानमंत्री जनकल्याणकारी योजना जागरुकता अभियानच्या माध्यमातून वेंगुर्ले येथे विश्वकर्मा लाभार्थी नोंदणी शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिराचा शुभारंभ भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य शरद चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी भाजपा कामगार मोर्चा सावंतवाडी विधानसभा संयोजकपदी निवड झाल्याबद्दल सत्यम नारायण सावंत यांचा शरद चव्हाण यांच्या हस्ते शाल- श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रसन्ना उर्फ बाळू देसाई, तालुकाध्यक्ष सुहास गवंडळकर, विश्वकर्माचे जिल्हा अध्यक्ष शरद मेस्त्री, रसिका मठकर, प्रधानमंत्री जनकल्याण योजनेचे ऑपरेटर यतीन गावडे व सना शेख आदी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कष्टाचा आदर



वेंगुर्ले तालुक्यात विश्वकर्मा लाभार्थी नोंदणी शिबिराचा शुभारंभवेळी उपस्थित शरद चव्हाण, सत्यम सावंत, प्रसन्ना देसाई, सुहास गवंडळकर.

आणि कष्टकऱ्यांचा सन्मान, हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे, हे आपल्या कृतीतून दाखवून दिले. विश्वनाथ धामच्या लोकार्पण सोहळ्यात श्रमिकांवर पुष्पवृष्टी करून, प्रयागराज कुंभमध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पाय धुऊन, नव्या संसदेत कामगारांचे विशेष दालन उभारुन, सर्वोच्च नेतृत्व देखील देशाच्या विकासात 'श्रमेव जयते'च्या ताकदीला मान्यता देत आहे हे दाखवून दिले.

मोदी सरकारने गेल्या ९ वर्षांत देशाच्या 'श्रमेव जयते' या परंपरेला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न केला आहे. देश कौशल्याचा सन्मान करत असतानाच कौशल्य विकासावरही सातत्याने भर दिला जात आहे. 'श्रमेव जयते' कार्यक्रमाचे पाच उपक्रम आहेत. त्यामध्ये प्रधानमंत्री श्रम - योगी मानधन योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना असे अनेक प्रयत्न कामगारांसाठी सुरक्षा कवच बनत आहेत. अशा योजनांमुळे देश आपल्या श्रमांचा आदर करतो, अशी भावना असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या मनात निर्माण झाली आहे. मोदी सरकारने देशातील प्रत्येक कष्टकऱ्याला सामाजिक सुरक्षा कक्षेत आणण्यासाठी 'श्रमेव जयते' कार्यक्रमा अंतर्गत, श्रम सुविधा पोर्टल असो. ई - श्रम पोर्टल असो किंवा या अंतर्गत असंघटित क्षेत्रातील कामगारांची नोंदणी करून त्यांना स्मार्ट कार्ड आणि सामाजिक संरक्षणाचे लाभ देणे असो, प्रत्येक कार्यक्रम वेगाने चालू आहेत. ४०० विविध क्षेत्रात काम करणारे २९ कोटींहून अधिक कामगार ई - श्रम पोर्टलमध्ये सामील झाले आहेत. बांधकाम कामगार, स्थलांतरित मजूर, घरगुती कामगार, गिग आणि प्लॅटफॉर्म कामगार हे देखील असंघटित क्षेत्राशी संबंधित आहेत. त्यांना यूएएन, आरोग्य, विमा यासारख्या सुविधा मिळत आहेत, असे मनोगत भाजपा कामगार मोर्चाचे सावंतवाडी विधानसभा संयोजक सत्यम सावंत यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रसन्ना देसाई यांनी केले.



अनधिकृत व्हिडिओ पार्लरवर कारवाई करण्यात यावी, याबाबतचे निवेदन देताना महाराष्ट्र निर्माण सेनेचे उपजिल्हाध्यक्ष कुणाल किनळेकर व व अन्य मनसैनिक.

# अनधिकृत व्हिडिओ गेम पार्लरवर कारवाई करा !

## मनसेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**कुडाळ** : अनधिकृत व्हिडिओ गेम पार्लरवर कारवाई करा, तसेच भविष्यात व्हिडिओ गेम पार्लरला परवानगी देण्यात येऊ नये, अशी मागणी करणारे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शिष्टमंडळाच्या वतीने जिल्हाधिकारी किशोर तावडे यांना देण्यात आले. यावेळी उपजिल्हाध्यक्ष कुणाला किनळेकर, तालुकाध्यक्ष हेमंत जाधव, उपतालुकाध्यक्ष गजानन राऊळ, सरंबळ शाखाध्यक्ष सीताराम कदम यावेळी उपस्थित होते. याबाबत मनसे उपजिल्हाध्यक्ष कुणाल केंद्रेकर यांनी कुडाळ येथे प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली.

मनसेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, सिंधुदुर्ग जिल्ह्यात कौशल्य खेळाच्या नावाखाली अनधिकृतरीत्या विनापरवाना व्हिडिओ गेम पार्लर मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. व्हिडिओ गेम खेळताना मोठ्या प्रमाणात पैसे लावून झटपट मोठा आर्थिक फायदा होण्याच्या आशेने जिल्ह्यातील अनेक युवक आकर्षित होऊन त्यामध्ये पैसे लावून खेळत आहेत तसेच हा व्हिडिओ गेम प्रकार हा कौशल्य खेळ नसल्यामुळे यामध्ये वापरण्यात येणारी मशीन ही कंम्प्युटर ऑपरेटर प्रोग्रॅम असल्यामुळे सदर मशीन ऑपरेटर आपल्या मनाप्रमाणे मशीन ऑपरेटिंग सेट करत असतात आणि यामुळे हा गेम खेळणाऱ्या युवकांची फार मोठी आर्थिक लूट फसवणूक होऊन जिल्ह्यातील अनेक युवक व त्यांचे संसार उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत.

काही दिवसांपूर्वी कणकवली येथे महाराष्ट्र जुगार अधिनियम अंतर्गत कारवाई करत तब्बल ४४ मशीन व रोख रक्कम ताब्यात घेत काही व्हिडिओ गेम पार्लर चालवणारे व खेळणाऱ्यांवर गुन्हे देखील दाखल केले आहेत. कारवाईच्या धास्तीने इतर तालुक्यातील व्हिडिओ गेम पार्लर तूर्तास बंद आहेत परंतु आम्हास मिळालेल्या माहितीनुसार व्हिडिओ गेम पार्लरचे मालक बनावट कागदपत्रांच्या आधारे सदर व्हिडिओ गेमची मशीन ही कौशल्य खेळ प्रकारातील असल्याचे भासवून आपल्या जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत परवानगी घेऊन बंद असलेले अनधिकृत व्हिडिओ गेम पार्लर पुन्हा सुरू करण्याच्या तयारीत आहेत. यामुळे जिल्ह्यातील तरुण युवक देशोधडीला लागले आहेत तरी अनधिकृत व्हिडिओ गेम पार्लर वर कारवाई करावी व अनधिकृत व्हिडिओ पाहिला परवानगी देण्यात येऊ नये अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### मनसेच दोन गट असल्याची चर्चा


महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज्य सरचिटणीस परशुराम उपरकर यांनीही महिनाभरापूर्वी अनधिकृत व्हिडिओ पार्लरवर कारवाई करावी, अशी मागणी पोलीस प्रशासनासह जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती. त्यानंतर तातडीने पोलीस प्रशासनाने महाराष्ट्र जुगार अधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात सुरुवात केली होती. मात्र, पुन्हा एकदा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी या संदर्भात निवेदन दिल्याने राजकीय वर्तुळात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत दोन गट असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

# गौड सारस्वत ब्राह्मण समाजाचा वेंगुर्ले येथे स्नेहमेळावा उत्साहात

कोकणसाद वृत्तसेवा

**वेंगुर्ले:** गौड सारस्वत समाज, वेंगुर्ला उपसमितीने वेंगुर्ले येथील स्वामिनी मंगल कार्यालयात आयोजित केलेला गौड सारस्वत ब्राम्हण समाज, सिंधुदुर्गचा स्नेहमेळावा व वधुवर मेळावा समाज बांधवांच्या भव्यदिव्य उपस्थितीत संपन्न झाला.

या मेळाव्याचे उद्‌घाटन गौड सारस्वत समाज सिंधुदुर्गचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत नाडकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी मेळाव्याचे अध्यक्ष सारस्वत बँकेचे संचालक सुनील सौदागर, प्रमुख पाहुणे विलींग्डन महाविद्यालय सांगलीचे प्राध्यापक विनायक राजाध्यक्ष, सारस्वत समाज सांगलीचे अध्यक्ष डॉ. विकास कोटणीस, सारस्वत विकास मंडळ कोल्हापूरचे माजी विश्वस्त शरद प्रभावळकर, गौड सारस्वत समाज सिंधुदुर्गचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत नाडकर्णी, उपाध्यक्ष रघुवीर उर्फ भाई मंत्री, सचिव संतोष पई, संस्थापक कार्यवाह राजस रेगे आदींचा समावेश होता.



वेंगुर्ले येथील स्वामिनी मंगल कार्यालयात आयोजित गौड सारस्वत समाज मेळाव्याचे दीपप्रज्वलनाने उद्‌घाटन करताना समाजाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत नाडकर्णी. सोबत सुनील सौदागर, रघुवीर मंत्री, डॉ. विकास कोटणीस, विनायक राजाध्यक्ष, शरद प्रभावळकर, सुजाता पडवळ, संजय पुनाळेकर.

या मेळाव्यात प्रमुख पाहुणे विनायक राजाध्यक्ष यांनी गेली हजारो वर्षे आपण ज्या डी. एन. ओ.मधून जन्म घेतोय तो पूर्वी आणि या पुढेही आपणाकडे आहे. तो म्हणजे कुशाग्र बुध्दीमत्ता हेच अस्त्र आपल्याकडे कायम रहाणार आहे. आपल्या गौड सारस्वत समाजाला कोणत्याच आरक्षणाची गरज नाही. असे स्पष्ट करीत, आपण आरक्षण न घेता तुम्ही दुसऱ्यांना नोकरी देणारे उद्योजक बना, असे आवाहन समाजातील तरूणांना केले.

या मेळाव्याच्या सुरुवातीस दिवंगतांना श्रध्दांजली वाहण्यात आल्यानंतर ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या स्नेहमेळाव्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ज्ञातीतील विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती डॉ. मालविका झांटये (मालवण), वैष्णवी प्रभू, ममता प्रभू (आजगाव), अंकित प्रभू-झांटये (आजगाव), अजय प्रभू-खानोलकर (वेंगुर्ला), प्रथमेश नाडकर्णी (कणकवली), अवधुत नाईक (वायंगणी), आशुतोष कुलकर्णी (कुडाळ), मंगेश माणगावकर (होडावडे), राजश्री परूळेकर यांचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे या वर्षीच्या सिंधुदुर्ग जिल्हा सारस्वत मित्र पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेले सारस्वत सामाजातील एक लोकप्रिय व्यक्तीमत्व असलेले सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रमोद कामत आणि वेंगुर्ला तालुका सारस्वत मित्र पुरस्कारासाठी निवड झालेले राज्य परिवहन मंडळात वाहतूक नियंत्रक पदावरून सेवानिवृत्त झालेले न्हैचीआड येथील प्रकाश रेगे या दोघांचाही शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम स्वरूपातील पुरस्काराने गौरविण्यात आले. सारस्वत बँक नेहमीच गौड सारस्वत समाजातील माणसाला सहकार्य आणि मदत करण्यासाठी तत्पर असल्याचे मेळाव्याचे अध्यक्ष आणि सारस्वत बँकचे संचालक सुनील सौदागर यांनी आपल्या भाषणांत सांगितले.

त्यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. विकास कोटणीस, शरद प्रभावळकर, रघुवीर मंत्री आणि जिल्हाध्यक्ष चंद्रकांत नाडकर्णी तसेच सत्कारमुर्ती प्रमोद कामत, प्रकाश रेगे, डॉ. मालविका झांटये व समाजाच्या तालुका अध्यक्ष सुजाता पडवळ यांनी आपली मनोगते यावेळी व्यक्त केली.

यावेळी वेंगुर्ला उपसमितीचे सदस्य सचिन वालावलकर यांची जिल्हा नियोजन मंडळावर निवड झाल्याने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात येऊन अभिनंदन करण्यात आले. तसेच उद्योजक तथा समाजिक कार्यकर्ते किरण उर्फ भैय्या सामंत यांनी समाजाच्या मेळाव्यास दिलेल्या शुभेच्छा संदेशाचे वाचन करण्यात आले.

दुपारच्या सत्रात वधु-वर मेळावा घेण्यात आला. ज्ञातीतील अनेक वधु-वरांनी या मेळाव्यामध्ये आपली नोंदणी केली. संध्याकाळी या मेळाव्याची सांगता झाली. या मेळाव्यास सुमारे ५५० ज्ञातीबांधव उपस्थित होते.

सदर मेळावा यशस्वी करण्यासाठी सुधीर झांटये, दिगंबर नाईक, अमोल प्रभू झांटये, अमोल आरोसकर, अमोल खानोलकर, प्रकाश रेगे, जनार्दन शेट्ये, सीमा नाईक, राखी दाभोलकर, डॉ. प्रसाद साळगांवकर, तृप्ती आरोसकर, सुषमा प्रभू-खानोलकर, स्वाती पोतनीस, अमृता पाडगांवकर, स्मिता नाबर यांनी विशेष परिश्रम घेतले.

प्रास्ताविक अमोल आरोसकर यांनी, संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संजय पुनाळेकर यांनी, आभाराचे काम अमोल प्रभू-झांटये यांनी पाहिले.

# साहित्यिकांनी नेमक्या परिस्थितीचे दर्शन घडवावे

## दीनबंधू भाई दिनकररावजी यादव स्मृती साहित्य संमेलनात ख्यातनाम कवी रामदास फुटाणे यांचे प्रतिपादन

**शिरोळ :** राजकारणासाठी धर्माचा वापर होत असून राजकारणाला वैचारिक बैठक राहिलेली नाही. याचा वाईट परिणाम प्रत्येकाच्या घरापर्यंत, चुलीपर्यंत आपण बघतो आहोत. त्यामुळे साहित्यिकांनी नेमक्या परिस्थितीचे दर्शन घडविणे गरजेचे आहे. त्याच पद्धतीने धर्म आणि विज्ञानाची सांगड घालून जगणे आवश्यक आहे. आपला धर्म, जात इतरांना त्रासदायक ठरणार नाही, माणसांमध्ये भिंती उभ्या राहणार नाहीत, याची काळजी घेण्यासाठी साहित्य संमेलने आवश्यक आहेत,

असे प्रतिपादन संमेलनाध्यक्ष, ख्यातनाम कवी रामदास फुटाणे यांनी केले.

शिरोळ येथील शब्दगंध साहित्य परिषद तर्फे श्री दत्त साखर कारखाना कार्यस्थळावर आयोजित दीनबंधू भाई दिनकररावजी यादव स्मृती नवव्या साहित्य संमेलनाच्या



**शिरोळ येथील साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना ज्येष्ठ कवी वात्रटिकाकार रामदास फुटाणे दत्तचे चेअरमन गणपतराव पाटील**

अध्यक्ष पदावरून बोलत होते.

रामदास फुटाणे पुढे म्हणाले, साहित्यिकांच्या विचारांची बैठक पक्की असेल तर समाज बांधण्याचे मोठे काम साहित्य संमेलने निश्चित करू शकतात. साहित्याच्या जाणीवा प्रगल्भ असाव्यात. यासाठी साहित्यिकांनी प्रथम आपली वैचारिक बैठक आणि भूमिका ठरवावी. जात, धर्म आणि वडिलांच्या पुण्याईवर आता इथून पुढे जगता येणार नाही. यासाठी या समाजातून परिवर्तनाच्या निश्चित दिशा मिळणे आवश्यक आहे.

यावेळी बोलताना प्रमुख पाहुणे आणि माजी कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत म्हणाले, राजकारण आणि साहित्यात मोठी दरी निर्माण झाली आहे. राजकारणाची गटारगंगा साफ करण्यासाठी सज्जन माणसांनी आणि साहित्यिकांनी पुढे येणे आवश्यक आहे. साहित्यिकांनी काय लिहावे, काय बोलावे हे ठरविणारी नवीन यंत्रणा देशात कार्यरत झाली आहे. यासाठी आपली भूमिका आणि जगण्याची दिशा ठाम राहिली पाहिजे. नव तंत्रज्ञान स्वीकारत असताना आत्मभान विसरत चाललो आहोत. अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी साहित्याची नवी पेरणी करणारी साहित्य संमेलने आवश्यक आहेत. साहित्य संमेलनातून समाजाला नवी प्रेरणा आणि दिशा देण्याचे यादव कुटुंबियांचे काम कौतुकास्पद आहे.

संमेलनात संमेलनाध्यक्ष रामदास फुटाणे आणि मान्यवरांच्या हस्ते 'जीवन गौरव पुरस्कार' देऊन समाजवादी प्रबोधिनीचे सरचिटणीस प्रसाद कुलकर्णी यांना तसेच कै.भाई दिनकरराव यादव 'जिल्हास्तरीय क्रीडा पुरस्कार' देऊन महाराष्ट्र केसरी महिला कुस्तीपटू कु. अमृता पुजारी (शिरोळ) यांना सन्मानित करण्यात आले. मानपत्राचे वाचन संजय सुतार आणि प्रा. अनिल कुंभार यांनी केले.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री दत्त कारखाना चेअरमन, उद्यानपंडित गणपतराव पाटील यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून सत्कार केला. प्रसाद कुलकर्णी आणि कु. अमृता पुजारी यांनी सत्काराला उत्तर दिले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रा. वसंत बंडोबा काळे यांच्या ३, कवितासागर प्रकाशनाची ३ पुस्तके तसेच सौ. वर्षाराणी सावंत यांच्या 'कल्पनेचे पंख' आणि डॉ. राजश्री पाटील यांच्या 'आणि चांदणे उन्हात हसले' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आला. डॉ. राजश्री पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

# दलितमित्र भाई दिनकररावजी यादव यांच्या पुण्यतिथी निमित्त श्रीदत्त साखर शिरोळच्या वतीने विनम्र अभिवादन

**शिरोळ :** कारखान्याचे आद्य संस्थापक माजी आमदार माजी जि. प.अध्यक्ष दलितमित्र दिनकररावजी भाऊसाहेब यादव यांची पुण्यतिथी निमित्त श्री दत्त साखर कारखान्याच्या मुख्य कार्यालयीन इमारतीसमोर उभारण्यात आलेल्या त्यांच्या पूर्णकृती पुतळ्यास अभिवादन करून साजरी करण्यात आली.

याप्रसंगी कारखान्याचे चेअरमन उद्यान पंडित गणपतराव आप्पासाहेब पाटील यांनी स्व. दिनकररावजी यादव यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला त्याचप्रमाणे स्व. आप्पासाहेब उर्फ सारे पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास संचालक रणजीत कदम यांनी स्व. दत्ताजीराव कदम अण्णा यांच्या पूर्णकृती पुतळ्यास संचालक रावसाहेब नाईक व स्व. विश्वासराव घोरपडे सरकार यांच्या पूर्णकृती पुतळ्यास व्हाईस चेअरमन अरुण कुमार देसाई यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी उपस्थित संचालक इतर मान्यवर व उपस्थितानी पुष्पकमल अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी संचालक इंद्रजीत पाटील,शेखर पाटील, ॲड प्रमोद पाटील,निजामसो पाटील,अमर यादव विजय सूर्यवंशी, दरगू गावडे, कार्यकारी संचालक एम व्ही पाटील सेक्रेटरी अशोक शिंदे,शेती अधिकारी श्रीशैल



**शिरोळ तालुक्याचे माजी आमदार पहिले जिल्हा परिषद अध्यक्ष दिनकरराव यादव यांचे पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करताना दत्तचे चेअरमन गणपतराव पाटील**

हेगाना, डिस्टलेरी मॅनेजर एस टी यादव,वर्क्स मॅनेजर संजय संकपाळ, प्रोडक्शन मॅनेजर विश्वजीत शिंदे, मॅनेजर फायनान्स एस एम भोसले,परचेस ऑफिसर वि टी माळी, ऊर्जांकुर मॅनेजर व्ही आर इंगळे, गेस्ट हाऊस इन्चार्ज शक्तीजित गुरव, सॅनिटरी इन्स्पेक्टर बाळासो गावडे, गार्डन सुपरवायझर प्रमोद पाटील, लेबर वेल्फेअर ऑफिसर जयदीप देसाई, हेडटाईम किपर राजेंद्र केरीपाळी, सिव्हिल इंजिनिअर एल पी पाटील,सिविल इंजिनिअर यशवंत माने,सुरक्षा अधिकारी एस व्ही घारगे पर्यावरण मॅनेजर सुनील पाटील चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक ए एम नानिवडेकर तसेच दत्त ऊस वाहतूक संघटनेचे अध्यक्ष धनाजी पाटील नरदेकर,अमोल चव्हाण सरपंच,उदय संकपाळ,शशिकांत पाटील, प्रकाश हलवाई, उदय पाटील (सर) हरी मोटे , भरत पाटील,कुमार गुरव,इरगोंडा देसाई, रोहन देसाई,आर के पाटील,दत्ता कोरे तसेच शर्करा औद्योगिक श्रमिक संघ कामगार सोसायटी यांचे पदाधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता

# क्राईम

## रेल्वेच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**पिंपरी :** तळेगाव दाभाडे रेल्वे स्टेशन जवळ रेल्वेच्या धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी (दि. ३०) सकाळी सव्वा अकरा वाजताच्या सुमारास घडली. संजय पांडुरंग घोजगे (वय ३६, रा. भगत प्लाझा, यशवंतनगर, तळेगाव स्टेशन. मूळ रा. आंबी, ता. मावळ) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई- बंगळुरु उद्यान एक्स्प्रेस (११३०१) या गाडीच्या धडकेत घोजगे यांचा मृत्यू झाला. ही घटना कातवी उड्डाणपूल येथे घडली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घोजगे यांचा मृतदेह ताब्यात घेत उत्तरीय तपासणीनंतर नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

## वाघोलीत दोन ट्रकच्या धडकेत चालक गंभीर

**पिंपरी :** पुणे-नगर रोडवर वाघोली येथे दोन ट्रकची धडक बसली. यामध्ये एक ट्रक चालक गंभीर जखमी झाला आहे. ही घटना बुधवारी (दि. ३१) पहाटे साडेपाच वाजताच्या सुमारास घडली. उमेश यादव असे गंभीर जखमी झालेल्या ट्रकचालकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे-नगर रोडवर वाघोली येथे सोयरीक मंगल कार्यालयाजवळ एमएच १२/ईक्यू १६५३ आणि केए ५६/६०६९ या दोन वाहनांचा अपघात झाला. घटनेची माहिती मिळताच पीएमआरडीए वाघोली अग्निशमन केंद्र येथील एक वाहन घटनास्थळी तात्काळ दाखल झाले. एमएच १२/ईक्यू १६५३ या ट्रकमध्ये चालक उमेश यादव हे पूर्णपणे अडकले होते. अग्निशमन विभागाच्या जवानांनी यादव यांना बाहेर काढले. त्यांना तात्काळ उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. वाहन चालक अल्ताफ पटेल, फायरमन सचिन गवळी, रिजवान फरास, संदीप तांबे, महेश पाटील यांनी हे बचावकार्य केले.

## मोटारीच्या धडकेत दोन मजुरांचा मृत्यू

**पुणे :** एनडीए चौक परिसरात पुलाची रंगरंगोटी करणाऱ्या दोन मजुरांचा भरधाव वाहनाच्या धडकेने मृत्यू झाला. मंगळवारी भरदिवसा हा अपघात झाला आहे. सनी मखनलाल गौड (वय २३), विजय बहादूर चौहान (वय २८, दोघे मूळ रा. उत्तर प्रदेश) अशी मृत्यू झालेल्या मजुरांची नावे आहेत. याप्रकरणी कारचालक बाळू शिंदे (रा. चिखली) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातात प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली आहे. मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर वेदभवन परिसरात पूल आहे. पुलाचे रंगरंगोटीचे काम एका ठेकेदाराकडे दिले होते. गौड व चौहान ठेकेदाराकडे कामाला होते. मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास गौड आणि चौहान पुलाचे रंगकाम करत होते. त्यावेळी भरधाव कारने पुलाच्या कठड्याला रंग देणाऱ्या गौड आणि चौहान यांना धडक दिली. गौड आणि चौहान पुलावरून खाली पडले. गंभीर जखमी झालेल्या दोघांना नागरिकांनी रूग्णालयात दाखल केले. उपचारांपूर्वीच दोघांचा मृत्यू झाला होता.

## निरीक्षकाच्या घरझडतीत सापडली २८ लाखांची रोकड

**पुणे :** राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक वाहतूक संस्थेच्या पेट्रोल पंपावर दहा हजारांची लाच घेताना पकडलेल्या वजन मापे निरीक्षकाच्या पुण्यातील घरात २८ लाख ५० हजार रुपयांची रोकड सापडली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने घरझडती घेतल्यानंतर ही रोकड आढळली आहे. अशोक श्रीपती गायकवाड (वय ५२) असे या निरीक्षकाचे नाव आहे. प्रवरानगरमधील राधाकृष्ण विखे पाटील सहकारी संस्थेच्या पेट्रोल पंपाची वार्षिक तपासणी करून प्रमाणपत्र देण्यास गायकवाड याने १२ हजार रुपयांची लाच मागितली होती. १० हजार रुपयांची लाच घेताना गायकवाड याला पकडले होते. एसीबीने याबाबतची माहिती पुण्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिली. त्यानंतर एसीबीच्या पथकाने गायकवाडच्या सिंहगड रस्त्यावरील घराची झडती घेतली. गायकवाडकडे कपाटात २८ लाख ५० हजार रुपये सापडले, तसेच मालमत्तेसंदर्भातील कागदपत्रे सापडली आहेत.

## अस्तित्व लपवल्या प्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** येथील शाहूपुरीत चौक ते दव्यिनगरी मार्गावर रात्रीच्या वेळी आपले अस्तत्वि लपवल्याप्रकरणी मंगळवार पेठेतील एका वीस वर्षीय युवकावर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २९ जानेवारी रोजी सायंकाळी सात ते पहाटे सहा वाजण्याच्या समोरास शाहूपुरी चौक ते दव्यिनगरी जाणाऱ्या मार्गावर न्यू सनडाऊन हॉटेलच्या आडोशाला विकास मुरलीधर मुळे (वय २०, रा. मंगळवार पेठ, सातारा) हा आपले अस्तत्वि लपवून आढळून आल्याची तक्रार पोलीस कॉन्स्टेबल स्वप्निल सावंत यांनी शाहूपुरी पोलीस ठाण्यात दिली.

# ज्यांच्या समोर झुकतात माना ...त्यांनीच बालकांसमोर जोडले हात

**सातारा :** मुलं ही देवाघरची फुलं असतात. या फुलांना जपले की त्यांच्या स्वभावातून चांगला सुगंध दरवळतो .छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट वंशज श्री छ खासदार उदयनराजे भोसले यांच्या जलमंदिर या निवासस्थानी सातारा स्पर्धेसाठी आलेल्या बालकांनी भेट घेतली. त्यांचे आशीर्वाद घेतले पण ज्या ठिकाणी अनेकांच्या माना झुकतात . त्या श्री. छ .खा. उदयनराजे भोसले यांनीच बालकांसमोर हात जोडून त्यांचे स्वागत केल्याने बाल मन भारावून गेले .

साताऱ्यातील जलमंदिर म्हणजे अनेकांचे आश्रयस्थान आहे. देशी- विदेशी अनेक लोक, अधिकारी ,लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, व्ही आय पी असे अनेक जण जल मंदिरात भेट घेऊन श्री.. छ खासदार उदयनराजे भोसले यांच्याशी संवाद साधतात. अभिनेते, नेते, शास्त्रज्ञ व आपापल्या भागात दरारा असलेले असे अनेक भाई सुद्धा तयांच्या चरणांवर लोटांगण घेतात. श्री. छ. खा. उदयनराजे भोसले यांची मान आराध्यदैवत व युगपुरुष प्रतिमा वगळता कोणा पुढे झुकत नाही. पण, आश्चर्याची गोष्ट म्हणजे साताऱ्यात बाल नाट्य स्पर्धेसाठी आलेल्या चिमुकल्यांच्या समोर त्यांनी दोन हात जोडून त्यांचे स्वागत केले. त्यामुळे हे मायाळू रूप पाहून बाल चिमुकल्यांची मन भारावून गेले. मैं खडा तो सबसे बडा... असे फिल्मी डायलॉग राजेबद्दल बोलले जाते. त्या राजांसाठी लहान मुलांचे बाल मनातून सुद्धा राजे... जय हो .. असा जयघोष करतात .

आगामी सातारा लोकसभा निवडणुकीतील भाजपचे उमेदवार म्हणून श्री छ खासदार उदयनराजे भोसले यांच्या प्रचाराची पहिली फेरी पूर्ण झालेली आहे. आणि निवडणुकीत पूर्वीच प्रचारातही



**साताऱ्यातील जल मंदिराच्या आवारात बाल चिमुकल्यांची संवाद साधताना श्री छ खा उदयनराजे भोसले.**

आघाडी घेतली. याबद्दल कुणाचे दुमत नाही.

त्यांच्या प्रचारासाठी भाजपच नव्हे तर महायुतीतील शिवसेना ,राष्ट्रवादी व घटक पक्ष प्रयत्नशील आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा महाराज विक्रमी मतांनी निवडून येतील. असे त्यांचे हितचिंतक सुनिल काटकर व अभ्यासू पत्रकार संदीप शिंदे , काका धुमाळ, पंकज चव्हाण, संग्राम बर्गे, विनीत पाटील , बाळासाहेब ननावरे यांनी काही प्रसारमाध्यमाशी बोलताना सांगितले.

## बालगृहातील प्रवेशितांच्या बालमहोत्सवास सुरुवात

**सातारा :** जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या बालगृहातील मुला-मुलींनी कला व सुप्त गुणांना संधी देण्याचे काम जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात येत आहे, ही बाब अतिशय कौतुकास्पद आहे असे सांगून सर्व मुला-मुलींना एकमेकांविषयी बंधुभाव व सांघिक भावना ठेऊन खेळाचा आनंद घ्यावा, असे आवाहन सहायक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले यांनी केले.

महिला व बाल विकास विभागामार्फत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अन्वये पोलीस कवायत मैदानावर जिल्हास्तरावरील चाचा नेहरू बालमहोत्सवाचे आयोजन आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन सहायक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले यांच्या हस्ते झाले.



# राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शिरोळमध्ये तहसीलदार कार्यालयासमोर आंदोलन

**शिरोळ :** महिला सुरक्षेसाठी कडक कायदे करा अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना प्रचलित कायद्यातील त्रुटी दूर करून तात्काळ मदत देण्यात यावी. दुष्काळ संबंधित दोन्ही शासन निर्णयातील तफावत दूर करून सर्वच महसूल मंडळांना छऊत्र निकषांच्या चारपट मदत देण्यात यावी. राज्यात रिक्त असलेली सर्व विभागांच्या सर्व संवर्गाची अडीच लाख रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत. छुप्या पद्धतीने सुरु असलेली कंत्राटी भरती तात्काळ बंद करावी यासंह अन्य मागण्यासाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाने शिरोळ येथील तहसिल कार्यालयासमोर मोदी सरकारच्या विरोधात जोरदार निदर्शने करीत आंदोलन केले. आणि मागणीने निवेदन नायब तहसिलदार योगेश जमदाडे यांनी दिले.

यावेळी बोलताना सौ. स्नेहा वसंतराव देसाई म्हणाल्या महिलांच्या सुरक्षेचा प्रश्नही दिवसेंदिवस बिकट बनत आहे. अनेक दिवस कडाक्याच्या थंडीत आंदोलन करुनही अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्याकडे सरकार ढुंकूनही बघत नाही. असे अनेक प्रश्न आणि अडचणी लोकांना भेडसावत असूनही त्याा सोडवण्याऐवजी सरकार जातीय वाद, धार्मिक संघर्ष आणि असेच इतर अनावश्यक मुद्दे पुढं आणून लोकांचं लक्ष दुसरीकडे वळवत आहे. तरी हे तातडीने थांबवुन सामान्य नागरीकांना न्याय द्यावा अशी मागणी त्यांनी यावेळी केली शिरोळ विधानसभा अध्यक्ष अभिजीत पवार. राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष विक्रमसिंह जगदाळे, यांनी केंद्र व राज्य शासनाच्या धोरणावर सडकून टीका केली वसंतराव देसाई, कुरुंदवाड राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तानाजी आलासे सामाजिक न्याय विभागाचे संदीप बिरणगे आदीनी संतप्त भावना सरकारच्या विरोधात व्यक्त केल्या.

# जयसिंगपूर बसस्थानकाचे रूप पालटणार

**जयसिंगपूर :** दोन कोटी रुपयांच्या विस्तारीकरण कामामुळे जयसिंगपूर बसस्थानकाचे चित्र पालटणार आहे. प्रवाशांना यामुळे जास्तीत जास्त सोयीसुविधा मिळणार आहेत. यामुळे बसस्थानकाचा कायापालट होऊन एस.टी. विभागाच्या उत्पन्नात निश्चितच भर पडणार आहे, असे प्रतिपादन क्रीडा व युवक कल्याणमंत्री संजय बनसोडे यांनी केले.

जयसिंगपूर बसस्थानक विस्तारीकरण बांधकामाचे भूमिपूजन व कोनशिलेचे अनावरण क्रीडा व युवक कल्याणमंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते झाले. जयसिंगपूर बसस्थानक विस्तारीकरणाचा प्रारंभ, कोथळी येथील क्रांती पतसंस्थेच्या नूतन वास्तूचे उद्घाटन मंत्री बनसोडे यांच्या हस्ते झाले. आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी स्वागत केले. माजी नगराध्यक्ष संजय पाटील यड्रावकर यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी शिरोळचे माजी नगराध्यक्ष अमरसिंह पाटील, अनघा बारटक्के, प्रकाश पाटील-टाकवडेकर, आदित्य पाटील-यड्रावकर, अनिल बागणे, अभिजीत पाटील, तहसीलदार अनिलकुमार हेळकर, गटविकास अधिकारी शंकर कवितके, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. पांडुरंग खटावकर, जयपाल कुंभोजे, मल्लाप्पा चौगुले, आदिनाथ आरबाळे, केशव राऊत, सतीश मलमे, विजयसिंह माने-देशमुख, विनायक पतंगे, रवींद्र भोसले, यशवंत कानतोडे, मनोज लिंग्रज, संदीप भोसले, भानुदास मदने, मानिनी तेलवेकर यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# वडगावात राष्ट्रवादी काँग्रेसचे घंटानाद आंदोलन

**वडगाव मावळ :** मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (शरद पवार गट) वतीने राज्यातील महायुती सरकारच्या विरोधात आज (गुरवार दि. १) रोजी घंटानाद आंदोलन करण्यात आले. दरम्यान ग्रामदैवत पोटोबा मंदिर ते तहसील कार्यालयापर्यंत निषेध मोर्चा काढण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने मावळ तहसीलदारांना यांना निवेदन देण्यात आले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय पडवळ जिल्हाध्यक्ष अतुल राऊत युवकचे तालुकाध्यक्ष विशाल वहिले महिलाध्यक्षा जयश्री पवार,मिकी कोचर अक्षय मुऱ्हे,किसन कदम सहकार सेलचे तालुकाध्यक्ष सुधाकर वाघमारे,पांडुरंग दाभाडे,भरत राजिवडे ,नवनाथ केदारी,सुनील शिंदे ,रमेश घोजगे,मंगेश खैरे,आफताब सय्यद,आदिनाथ मालपोटे,योगेश करवंदे,सोमनाथ




धोंगडे बारकू ढोरे, नितीन भांबळ, पंकज सांबरे राजेश बाफना,शंकर मोढवे प्रणव ढोरे,राहील तांबोळी आदीजण उपस्थित होते.

तहसीलदारांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की समाजातील युवा,विद्यार्थी, शेतकरी, बेरोजगार, महिलासुरक्षा, कामगार,अंगणवाडी सेविका असे सर्वच घटक हे त्रस्त असून या सर्व घटकांना वेगवेगळ्या अडचणींना सामोरं जावं लागत आहे. कापूस, सोयाबीन, कांदा, तूर या शेतमालाला भाव नाही, अतिवृष्टीमुळे किंवा दुष्काळामुळे पिकाचं नुकसान होऊन ही विम्याची नुकसान भरपाई मिळत नाही.

नोकरभरती हजार रुपये शुल्क आकारूनही होत असलेली पेपरफुटी ही तर नेहमीचीच बाब झाली आहे.

महाराष्ट्राच्या वाट्याचे हक्काचे प्रकल्प इतर राज्यांत आणि त्यातही प्रामुख्याने गुजरातमध्ये नेले जात आहेत. महिलांच्या सुरक्षा अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या आंदोलनाकडं सरकार ढुंकूनही बघत नाही. राज्यात ३२लाख युवा स्पर्धा परीक्षा ,रखडलेली अडीच लाख रिक्तपदांची भरती,विद्यार्थ्यांचे शिक्षण,आदी विविध प्रश्नांकडे सरकार लक्ष देत नाही.

असे अनेक प्रश्न आणि अडचणी लोकांना भेडसावत असूनही त्या सोडवण्याऐवजी सरकार जातीयवाद, धार्मिक संघर्ष आणि असेच इतर अनावश्यक मुद्दे पुढं आणून लोकांचं लक्ष दुसरी कडे वळवण्याचं काम करत आहे. यामुळे महाराष्ट्राच्या पुरोगामित्त्वाला तडा जातोच पण राज्याच्या प्रगतीलाही खीळ बसत आहे आणि त्यात नुकसान मात्र सामान्य माणसाचंच होत आहे.

## ईडीच्या विरोधात घोषणाबाजी

**आमदार रोहित पवार यांनी मागील चार वर्षाच्या काळात वाढणारी बेरोजगारी, पेपरफुटी व त्यावर कायदा, कंत्राटी नोकरभरती, राज्यातून बाहेर गेलेले उद्योग यासह असंख्य प्रश्नांवर सरकारला धारेवर धरले तसेच राज्यातील युवकांचे, महिलांचे शेतकऱ्यांचे, व्यापाऱ्यांचे, विद्यार्थ्यांचे, कर्मचाऱ्यांचे प्रश्न सुटावेत म्हणून सरकारच्या पातळीवर लढा उभा करून सर्वसामान्य लोकांना न्याय देण्यासाठी संघर्ष केला. या लढ्याला महाराष्ट्रातून जनतेचा व युवकांचा मिळणारा पाठिंबा पाहून केंद्र सरकारच्या तपास यंत्रणांच्या आडून राजकीय सूड उगवण्याचे काम सध्या भाजपा करत आहे.**

**मा.अतुल राऊत**
**जिल्हाध्यक्ष ओबीसी राष्ट्रवादी काँग्रेस**

## आमदार रोहित पवार यांच्या चौकशीचा राष्ट्रवादी काँग्रेसकडून तीव्र विरोध

# प्रशासकीय भवन समोर धरणे आंदोलन

**बारामती:** राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते आमदार रोहित पवार यांच्या ईडीमार्फत होणाऱ्या चौकशीच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसच्या बारामती येथील कार्यकर्त्यांनी थेट रस्त्यावर उतरुन निषेध केला आहे. बारामती शहरातील प्रशासकीय भवन या ठिकाणी सुमारे एक तास ठिय्या मांडून या चौकशीप्रकरणी सरकारविरोधात कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

रोहित पवार हे राज्यातील सामान्य नागरीक, विद्यार्थी, युवा, शेतकरी, महिला यांच्या मुद्द्यांवरही ते सरकारला कोंडीत पकडण्याचे काम करत आहेत. केवळ आपल्या मतदारसंघापुरतेच मुद्दे ते मांडत नाहीत .तर राज्यातील विविध घटकांचे मुद्दे ते आक्रमकपणे मांडत आहेत. आमदार म्हणून विधानसभेत आणि रस्त्यावरची लढाईही आमदार रोहित पवार हे लढत असल्याचे दिसते. राज्यातील युवांच्या प्रश्नावर नुकतीच त्यांनी पुणे ते नागपूर अशी तब्बल ८०० कि.मी. हून अधिक लांबीची युवा संघर्ष यात्रा काढून त्याकडे सरकारचे लक्ष वेधलेच पण सोबतच शेतकरी, महिला, कामगार, बेरोजगार यांचे मुद्देही आक्रमकपणे मांडले. युवा संघर्ष यात्रेच्या समारोपाला तर त्यांचा आक्रमकपणा आणि त्यांना मिळत असलेला प्रचंड प्रतिसाद संपूर्ण राज्याला बघायला मिळाला.

त्यामुळेच लोकांचे प्रश्न मांडणाऱ्या या युवा नेत्याला रोखण्यासाठी सरकारकडून सूडाची कारवाई केली जात असून ईडीच्या चौकशीचा ससेमिरा त्यांच्यामागे लावल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. लोकशाहीमध्ये लोकांचे प्रश्न मांडणाऱ्या नेत्याविरोधात कारवाई केली जात असेल आणि त्याचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न केला जात असेल तर ते धोकादायक आहे.

आज आमदार रोहित पवार यांची चौकशी ज्या राज्य सहकारी बँकेच्या प्रकारणावरून केली जात आहे त्या राज्य सहकारी बँकेच्या तत्कालीन संचालक मंडळांची यादी पाहीली तर त्यापैकी अनेकजण आज भाजपमध्ये किंवा अजित पवार गटामध्ये किंवा शिंदे गटामध्ये आहेत. त्यात स्वतः अजित पवार यांच्यासह अमरसिंह पंडीत, सुनील फुंदे, नितीन पाटील, माणिकराव कोकाटे, रामप्रसाद बोर्डीकर, शेखर निकम, विजयसिंह मोहिते पाटील, राजन तेली, दिलीपराव सोपल, आनंदराव अडसूळ, धनंजय दलाल यांचा समावेश आहे. शिवाय या बरखास्त संचालक मंडळाविरोधात गुन्हा दाखल असून यामध्ये रोहित पवार यांचा काहीही संबंध नाही. परंतु या सर्वांभोवती सत्तेचे कवच असल्याने त्यांची कोणतीही चौकशी केली जात नाही परंतु आमदार रोहित पवार यांचा कोणताही संबंध नसताना त्यांची मात्र चौकशी केली जात असून 'चोर सोड़न सन्याशाला फाशी' देण्याचा हा प्रकार असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

तसेच नाबार्डचा अहवाल आणि उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिकेनुसार दाखल झालेला गुन्हा हा २०१० चा असून आमदार रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रो कंपनीने कन्नड येथील साखर कारखाना हा २०१२ साली लिलावामध्ये ५०.२० कोटी इतकी सर्वाधिक बोली लावून खरेदी केलेला आहे. त्यामुळे राज्य बँकेकडून बेकायदेशीर कर्जवाटप प्रकरणात आमदार रोहित पवार यांचा दुरान्वयेही संबंध नाही. शिवाय २०१९ मध्ये ईडी आणि आर्थिक



गुन्हे शाखेने दाखल केलेल्या गुन्ह्याच्या तपासात कोणताही बेकायदेशीर व्यवहार झाला नसल्याचे स्पष्ट झाले, त्यामुळे हा तपासही बंद करण्यात आला आहे. परंतु केवळ त्रास देण्याच्या हेतूनेच या सरकारकडून आमदार रोहित पवार यांची चौकशी करत असून लोकांचे प्रश्न विचारणाऱ्याला जाणीवपूर्वक त्रास दिला जात असल्याचे या आंदोलकांचे म्हणणे आहे. याविरोधातच हे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले असून त्यांनी आक्रमकपणे सरकारविरोधात घोषणाबाजी करून निषेध केला.

या आंदोलनात तालुका अध्यक्ष ड एस. एन जगताप, शहराध्यक्ष ड संदीप गुजर, शहर युवक अध्यक्ष सत्यव्रत काळे ,तालुका युवक अध्यक्ष बोरकर यांच्यासह पदाधिकारी आणि असंख्य कार्यकर्ते व सामान्य नागरीक सहभागी झाले होते.

# उपमुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर ओबीसी व भटक्या विमुक्त समाजाचे आंदोलन

**बारामती:** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामती येथील निवासस्थानासमोर ओबीसी व भटके विमुक्त समाजाने आज तीव्र आंदोलन केले. मराठा समाजाच्या बाजूने निर्णय घेतल्याबद्दल व अखंड ओबीसी वर अन्यायकारक भूमिका घेतल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सरकारचा जाहीर निषेध यावेळी करण्यात आला.



बारामती तालुक्यातील सर्व ओबीसी समाजातील प्रतिनिधी उपस्थित राहून पंचायत समितीपासून पदयात्रा काढून घोषणाबाजी यावेळी करण्यात आली. या विषयी सरकारने गंभीर दखल घ्यावी, अन्यथा राज्यात अराजगता होऊन ओबीसींचा उद्रेक होऊ शकतो ,असा इशारा यावेळी सरकारला इशारा देण्यात आला. यावेळी अनेक महिला व पुरुष पदाधिकाऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

या आंदोलनाचे आयोजन सकल ओबीसी व भटक्या विमुक्त समितीच्या माध्यमातून ड.जी.बी गावडे, ज्ञानेश्वर कौले,ड.रमेश कोकरे ड.गोविंद देवकाते,अनिल लडकत,बापुराव सोनलकर,देवेंद्र बनकर,ड. प्रियदर्शनी कोकरे,किशोर मासाळ,राजाभाऊ बरकडे, निलेश टिळेकर,सचिन शाहीर,रोहित बनकर,नितीन शेंडे,ड.अमोल सातकर,संदीप अभंग,संजय गिरमे,वनिता बनकर,सागर राऊत,ड. दिलीप धायगुडे,दादाराव काळोखे,संतोष काशीद,नाना मदने यांनी केले होते.

राज्य शासनाने मराठा आरक्षणासंदर्भात 'सगेसोयरे' या शब्दाची व्याख्या बदलून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब दि. २६ जानेवारी २०२४ नुसार मसूदा काढला आहे. त्यामुळे ओबीसी समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आपला हा निर्णय मूळ ओबीसीवर अन्याय करणारा आहे. त्याचबरोबर शिंदे समिती ही घटनात्मक नसताना शिंदे समितीच्या शिफारसीवरून कुणबी प्रमाणपत्र देणे हे घटनाबाह्य असल्याचे मत यावेळी नोंदविण्यात आले.

मराठा समाजाच्या दबावाला बळी पडून सरकारने घेतलेल्या या बेकायदेशीर आणि मागासवर्गीयांसाठी अन्यायकारक असलेल्या या निर्णयाला आमचा विरोध आहे. तरी, दि.२६ जानेवारीच्या अधिसूचनेचा मसूदा रद्द करण्यात यावा, राज्य मागासवर्ग आयोग व न्यायमुर्ती शिंदे समिती रद्द करण्यात यावी. तसेच चुकीच्या कार्यपध्दतीने व बेकायदेशिर रित्या वितरीत होणाऱ्या सदर मराठा - कुणबी किंवा कुणबी -मराठा प्रमाणपत्रांचे वितरणाला स्थगिती देण्यात यावी,आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

# मावळ तालुक्यातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना मिळणार गती

**वडगाव मावळ :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मावळ विधानसभा मतदारसंघातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना गती देण्यासाठी मंत्रालयात गुरुवार दि.१ बैठक संपन्न झाली.

या बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण,आमदार सुनिल शेळके तसेच वित्त व नियोजन विभाग, सा.बां विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

याबैठकीत मावळातील विकासकामे,महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची सद्यस्थिती व पुढील कार्यवाही यावर सविस्तर चर्चा झाली.

१ आई एकविरा देवी मंदिर परिसर विकास आराखडा व रोप-वे उभारणे कामास गती देण्यासाठी वन विभाग व पुरातत्व विभागाच्या संपूर्ण परवानग्या (छजउ) दोन महिन्याच्या आत घेण्याच्या सुचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

१ जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील वाहतूक कोंडी व अपघात रोखण्यासाठी कार्ला ते देहूरोड दरम्यान आवश्यक असलेल्या आठ ठिकाणी



उड्डाणपूल उभारण्यासाठीच्या प्रस्तावाला चडठऊ च्या अधिकाऱ्यांनी केंद्रीय स्तरावर पाठपुरावा करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

१ जांभूळ येथे क्रीडा संकुल उभारण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव महसूल विभागाकडे सादर केलेला असून तालुकास्तरीय अद्ययावत क्रिडा संकुल उभारण्यासाठी तात्काळ मान्यता द्यावी.

**उपमुख्यमंत्री अजितदादांनी या प्रकल्पांना गती देण्याच्या सुचना बैठकीत दिल्याने मावळच्या सर्वांगीण विकासाच्या दूरदृष्टीतून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या कामांचा वेग वाढणार आहे.**

**-आमदार सुनिल शेळके.**

१ ग्लास स्कायवॉक प्रकल्पाचा संपूर्ण विकास आराखडा राबविण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

# गृहनिर्माण सोसायटीतून दागिने चोरणाऱ्या महिलेस शिताफीने अटक

## नारायणगाव पोलिसांची कामगिरी

**नारायणगाव :** नारायणगाव, कोल्हेमळा येथील सुविधा सोसायटीतून दागिने लंपास करणाऱ्या ऊसतोड कामगार महिलेस नारायणगाव पोलिसांनी २४ तासांत जेरबंद करून बेड्या ठोकल्या. तिच्याकडून ४ लाख ३० हजार रुपये किंमतीचे चोरीचे दागिने हस्तगत करण्यात आले असून, तिची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. या चोरीतील १०० टक्के मुद्देमालाची वसुली केल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली.



महिला आरोपी कविता नवनाथ बर्डे (वय-२३, रा.निवृत्तीनगर, विघ्नहर साखर कारखाना, ता. जुन्नर), असे अटक केलेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी बाबाजी लक्ष्मण दिघे (रा. सुविधा रेसिडेन्सी, नारायणगाव, ता. जुन्नर) यांनी नारायणगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. फिर्यादी दिघे हे रविवारी (दि. २८) दुपारी एक वाजण्याच्या दरम्यान कार्यक्रमानिमित्त बाहेर गेले होते. त्यावेळी चोरट्याने त्यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून घरामधील कपाटातील ४ लाख ३० हजारांचे सोन्याचे दागिने चोरून नेले होते. नारायणगावचे सहायक पोलिस निरीक्षक महादेव शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक जगदीश पाटील, विनोद धुर्वे, पोलीस जवान शैलेश वाघमारे, सत्यम केळकर यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली. त्यानंतर कोल्हेमळा, नारायणगाव व परिसरातील सुमारे ५० सीसीटीव्ही फुटेजेस तपासले. त्यानंतर संशयित ऊसतोड महिला बर्डे हिला ताब्यात घेऊन चौकशी केली.

# मंजूर प्लॉटच्या ताब्यांबाबत शिवाजीनगर ग्रामपंचायतचे उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**खंडाळा :** शासकीय आदेश असतानाही अनेक वर्षापासून प्रलंबित असणाऱ्या शिवाजीनगर येथील स.नं.७८/ गट नं.१४२१ या मधील मंजूर जागेवर प्लॉटधारकांना ताबा मिळण्याबाबत शिवाजीनगर ग्रामपंचायतीतर्फे सरपंच हर्षवर्धन भोसले यांनी निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांना निवेदन दिले. यामधे, खंडाळा तालुक्यातील शिवाजीनगर या ठिकाणी असणाऱ्या स. नं.७८ मधील गट नं.१४२१ हा ग्रामपंचायत शिवाजीनगरच्या नावावर आहे. यामध्ये असणाऱ्या एकूण ३.२१ आर. इतक्या क्षेत्रात एकूण ५६ प्लॉट शासकीय आदेशाने मंजूर केलेले आहेत, तरीही या प्लॉटधारकांना अद्याप जागेचे वाटप करून ताबा दिला गेला नाही. मंजूर धारकांना जागेचा ताबा मिळण्यात यावा या मागणीसाठी हे निवेदन देण्यात आले. अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित असल्याने ग्रामपंचायतने घेतलेल्या सकारात्मक निर्णयामुळे संबंधित ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे. सरपंच हर्षवर्धन भोसले, उपसरपंच राधिका सपकाळ, सदस्य राजेंद्र भोसले, सुजित डेरे, चंद्रकात पवार, शोभा भोसले, ज्योती भोसले, स्वाती भोसले, सलिता सपकाळ, ग्रामसेवक बनकर यांच्या वतीने सदर निवेदन देण्यात आले.

# वकीलांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**सातारा :** राहुरी (जि. अहमदनगर) न्यायालयात वकीली व्यवसाय करणारे ड. राजाराम आढाव व त्यांच्या पत्नी ड. मनीषा आढाव (रा. मानोरी, ता. राहुरी) यांचे अपहरण करुन हत्या करण्यात आली. याबाबतच्या घटनेच्या अनुषंगाने व वकीलांच्या सुरक्षिततेसाठी डव्होकेट प्रोटेक्शन क्ट कायदा संमत करण्यात यावा, याबाबत गांभीर्याने न घेतल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला. यावेळी महाराष्ट्र न्ड गोवा बार असोसिएशनचे सदस्य तथा माजी चेअरमन वसंतराव एकनाथराव भोसले, सातारा जिल्हा बार असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष विजय आनंदराव देशमुख, उपाध्यक्ष जितेंद्र यशवंत पिसाळ, सचिव सुरेश महादेव रूपनवर, सहसचिव रोहिणी शंतनू राक्षे आणि सर्व वकील सदस्य आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# जय पवार यांच्या हस्ते राष्ट्रवादीच्या ११ शाखांचे उदघाटन



**बारामती :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे धाकटे चिरंजीव जय पवार यांनी बारामतीमध्ये कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव लक्ष घालण्यास सुरुवात केली असून

गुरुवारी(दि १) बारामती शहरात राषट्रवादी युवक काँग्रेसच्या ११ शाखांचे उदघाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले.

बारामती शहरातील जळोची,तांदुळवाडी,रुइ,खंडोबानगर,जामदार रोड,एकतानगर,वसंतनगर,जगताप मळा,सिध्देश्वर गल्ली, येथील राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शाखांचे उदघाटन केले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भुमिका विकासाची आहे.त्याचसाठी त्यांनी निर्णायक भुमिका घेतली.बारामतीच्या परीपुर्ण विकासासाठी त्यांना पाठींबा देण्याची गरज जय पवार यांनी व्यक्त केली.तसेच शहराध्यक्ष जय पाटील आणि शहर कार्यकर्ते यांचे संघटन कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोदगार जय पवार यांनी काढले.

यावेळी खंडोबानगर येथे जय पवार यांनी एका हॉटेलमध्ये चहाचा आनंद घेत बारामतीकरांशी संवाद साधला. या दौऱ्याबाबत राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष जय पाटील म्हणाले ,उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर संपुर्ण राज्याची जबाबदारी आहे.त्यातून देखील अजितदादा बारामतीला शक्य तेवढा अधिक वेळ देतात.आज जय पवार यांच्या दौर्यामुळे कार्यकर्तेयांच्यात उत्साह दिसून आला.भविष्यात त्यांनी युवकांच्या संघटन बांधणीत बारामतीला अधिक वेळ देणार असल्याचे सांगितले आहे.

दौर्याच्या वेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष जय पाटील,तालुकाध्यक्ष संभाजी होळकर,बारामती बँकेचे अध्यक्ष सचिन सातव ,युवकचे अध्यक्ष अविनाश बांदल आदी उपस्थित होते.

# चंदुकाका सराफ ज्वेलर्सच्या वतीने शिरवळ येथे

## सोन्याच्या व हिर्यांच्या दागिन्यांचे भव्य प्रदर्शन व विक्रीचा शुभारंभ

**शिरवळ :** विश्वासार्हता, शुध्दता आणि कामातील सचोटी या गुणांमुळे चंदुकाका सराफ ज्वेल्स यांनी संपुर्ण राज्यभर ज्वेलरी क्षेत्रात आपला ठसा ग्राहकांच्या मनात साकारला आहे. चंदुकाका सराफ ज्वेल्स ने महाराष्ट्रातील सुवर्ण पेढ्यांमध्ये आपला नावलौकिक मिळवला असून सुवर्ण अलंकाराचे अनेक दागिने घडवत महाराष्ट्राची संस्कृती जपलेली आहे असे उद्गार खंडाळा पंचायत समितीचे सभापती व किसनवीर सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन राजेंद्र आण्णा तांबे यांनी व्यक्त केले.

चंदुकाका सराफ ज्वेल्स यांनी शिरवळ येथे आयोजित केलेल्या सोने व हिऱ्यांच्या दागिन्यांच्या प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी श्री. तांबे बोलत होते. यावेळी शिरवळ ग्रामपंचायतीचे सरपंच रविराज दुधगावकर, उपसरपंच ताहीरभाई काझी, शिरवळ ग्रामपंचायतीचे सदस्य संग्राम देशमुख, सौ. पुजाताई मगर, शिवसेना नेते संजयसिंह देशमुख, अमोल कबुले, रोहित जाधव, हेमंत मगर, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब बोड्रे, प्रथम ग्राहक आणि प्रतिष्ठित नागरीक श्री. थोपटे गुरूजी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

सोने व हिर्यांच्या लक्षवेधी दागिन्यांचे भव्य प्रदर्शन व विक्री शिरवळ येथे दि. १ ते ४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत कै. तुकाराम संतोबा कबुले सांस्कृतिक भवन, केदारेश्वर मंदिराजवळ येथे स. १० ते रा ८. या वेळेत सुरू रहाणार आहे. सदर प्रदर्शनाला शिरवळवासीयांनी पहिल्या दिवसापासूनच उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.

यानिमित्त आनंदोत्सव महिलांचा हा खरेदी, मस्ती आणि बक्षिसांचा अनोखा मेळावा, भव्य लकी ड्रॉ. दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी ४ ते सायं. ७ वाजेपर्यंत आयोजित केला आहे. या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये सोने व हिर्याचे नवनवीन डिझाईन्स्चे असंख्य दागिने शिरवळवासीयांना उपलब्ध करण्यात आले आहे. आपले आवडते दागिने घेण्यासाठी या प्रदर्शनाला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन चंदुकाका सराफ ज्वेल्स चे संचालक श्री. सिध्दार्थ शहा यांच्यातर्फे करण्यात आले.



**प्रदर्शनाचा शुभारंभ करताना राजेंद्र तांबे शेजारी रविराज दुधगांवकर, ताहीरभाई काझी, संग्राम देशमुख, सौ. पुजाताई मगर, संजयसिंह देशमुख, अमोल कबुले, रोहित जाधव, हेमंत मगर, बाळासाहेब बोड्रे, श्री. थोपटे व अन्य.**

## महत्त्वाचे

### जागावाटपात रस्सीखेच

**मुंबई :** महाविकास आघाडीतील जागावाटपाच्या बैठकांचे सत्र सुरू असले तरी, आठ ते दहा जागांवर काँग्रेस आणि शिवसेना यांच्यातच रस्सीखेच सुरू आहे. काही जागांचा वाद मिटविण्यासाठी २ फेब्रुवारीला मुंबईत आघाडीची बैठक होणार आहे. त्यानंतर ३ फेब्रुवारीला दिल्लीत होणाऱ्या बैठकीत अंतिम निर्णय होणे अपेक्षित आहे.

जागावाटपाबाबत महाविकास आघाडीतील काँग्रेस, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या प्रमुख तीन पक्षांच्या बैठका सुरू आहेत. आतापर्यंतच्या बैठकांमध्ये राज्यातील ४८ पैकी ३६ ते ३८ जागांवर सहमती झाल्याचे समजते. दहा-बारा जागांचा वाद आहे. त्यापैकी सहा जागांवर काँग्रेस व शिवसेना यांच्यात रस्सीखेच सुरू आहे. मागील लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला फक्त चंद्रपूर या एका जागेवर विजय मिळाला होता. परंतु आता या पक्षाने सर्वाधिक जागांवर दावा केल्याचे कळते. शिवसेनेने जिंकलेले रामटेक, शिर्डी, हिंगोली, दक्षिण मुंबई हे मतदारसंघ काँग्रेसला हवे आहेत. शिवसेना जिंकलेल्या जागा असल्याने त्यावरील हक्क सोडायला तयार नाही. या मतदारसंघातून निवडून आलेले खासदार शिवसेना शिंदे गटात गेले आहेत, त्यामुळे त्या जागा शिवसेना ठाकरे गटाला सोडायला काँग्रेस तयार नाही.

काँग्रेसचा आग्रह त्याचबरोबर भिवंडी मतदारसंघावरही काँग्रेस व शिवसेनेने दावा केला आहे. मागील निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसची युती होती. त्यावेळी अमरावती मतदारसंघ राष्ट्रवादीला देण्यात आला होता. राष्ट्रवादीने अपक्ष उमेदवार नवनीत राणा यांना पाठिबा दिला होता. ही जागा आता राष्ट्रवादीला सोडण्यास काँग्रेस तयार नाही. वर्धा मतदारसंघावरही काँग्रेसने दावा केला आहे. मुंबईत

# माढा लोकसभा

## रणजितसिंह यांची गोळाबेरीज; रामराजेंचीही स्वारी



**सातारा :** सातारा आणि सोलापूर जिल्ह्यात पसरलेल्या माढालोकसभामतदारसंघासाठी जागावाटपापूर्वीच महायुतीकडून जोरदार तयारी असून भाजपच्या विद्यमान खासदार रणजितसिंह यांनी गोळाबेरजेस सुरूवात केली आहे. तर युतीतीलच रामराजेंनीही निवडणुकीचे मनुसबे आखले आहेत. रामराजेंच्या या खेळीमागे रणजितसिंह यांना डिवचण्याचा हेतू असू शकतो. तसेच जागावाटपात मतदारसंघ राष्ट्रवादीच्या वाट्याला आल्यास माढा काबीजचे डावपेचही असणार आहेत.

लोकसभेचा माढा मतदारसंघ २००९ साली अस्तित्वात आला. सोलापूर जिल्ह्यातील माढा, सांगोला, करमाळा आणि माळशिरस तर साताऱ्यातील माण व फलटण विधानसभा मतदारसंघांचा यामध्ये समावेश आहे. पहिल्या दोन टर्म राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी मतदारसंघाचे नेतृत्व केले. २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या गडाला भगदाड पाडत भाजपच्यारणजितसिंह नाईक-निंबाळकरयांनी विजय मिळवला. मागील पाच वर्षांच्या काळात मतदारसंघात अनेक उलथापालथी झाल्या. तरीही उपमुख्यमंत्री अजित पवार भाजपबरोबर आल्याने युतीची ताकद वाढली आहे. त्यामुळे मतदार संघातील विधानसभेचे सर्व सहा आमदार महायुतीचेच आहेत. महायुतीत मतदार संघावर भाजपचा दावा आहे.

त्यामुळे सध्यातरी खासदार रणजितसिंह हेच भाजपचे उमेदवार असतील. पण, दुसरीकडे विजयसिंह मोहिते-पाटील यांचे पुतणे आणि भाजपचे सोलापूर जिल्हा संघटक धैर्यशील मोहिते-पाटीलही तयारीत आहेत. मोहिते-पाटील आणि खासदार रणजितसिंह यांचे राजकीय संबंधही पूर्वीसारखे नाहीत. त्यामुळे विजयसिंह मोहिते व त्यांचे पुत्र हे खासदार रणजितसिंह यांना मदत करणार का ? याबाबत साशंकता आहे. तर भाजपकडून उमेदवारी न मिळाल्यास धैर्यशील मोहिते-पाटील दुसरा डाव टाकण्याच्या तयारीत आहेत. ते शरद पवार यांच्याकडे जाऊ शकतात. असे झाले तर भाजपसाठी धोक्याची घंटा ठरू शकते. अशा स्थितीत माळशिरसचे आमदार राम सातपुते हे भाजपबरोबरच राहू शकतात. त्याचबरोबर माढ्याचे आमदार बबनराव शिंदे आणि करमाळ्याचे आमदार संजय शिंदे हे दोघे बंधू अजित पवार गटात असल्याने भाजपला अर्थात विद्यमान खासदारांना मोठी रसद मिळू शकते. पण, अजित पवार गटात असलेले विधान परिषदेचे माजी सभापतीरामराजे नाईक-निंबाळकरयांनीही माढ्याची तयारी केली आहे.

काही दिवसांपूर्वीच रामराजेंनी माढ्याचे आमदार बबनराव शिंदे यांची भेट घेऊन राजकीय चर्चा केली. या भेटीत अनेक अन्थ दडलेले आहेत. कारण, आमदार बबनराव शिंदे आणि त्यांचे बंधू आमदार संजय शिंदे यांनी खासदारांना दोन लाखांचे मताधिक्य देण्याची घोषणा केली होती. यातून रामराजेंनी बबनराव शिंदे यांची भेट घेणे हे खासदारांना डिवचण्याचाच भाग असू शकतो.

तसेच रामराजेंसह आमदार शिंदे बंधुही एकाच गटात आहेत. त्यामुळे माढा अजित पवार गटाकडे आल्यास आपली उमेदवारी भक्कम रहावी, अशी खेळीही यामागे असू शकते. त्यामुळे रामराजे हे माढ्याच्या तयारीत असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर रामराजे आणि विजयसिंह मोहिते-पाटील यांचे संबंध चांगले आहेत. यातूनही रामराजेंनी खासदारांना आणखी डिवचले आहे. त्यामुळे माढ्याचे राजकारण आणखी वेगळे वळण घेणार असलेतरी खासदारांच्या पाठीमागे माणचे आमदार जयकुमार गोरे आणि सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांची ताकद भक्कम असणार आहे हेही स्पष्ट आहे.

### रामराजेंची दिशा ठरणार..

**लोकसभानिवडणुकीसाठी फलटण तालुक्यातील राजे गटाच्या कार्यकर्त्यांची भूमिका जाणून घेण्यासाठी फलटणला गुरुवारी बैठक घेण्यात आलेली आहे. यावेळी रामराजेही उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या बैठकीत रामराजे आपली राजकीय भूमिका स्पष्ट करु शकतात. यातूनच माढ्याचे राजकीय गणित काय असणार आणि राजकीय फासे कसे पडणार याचा अंदाजही येणार आहे. त्यामुळे या बैठकीकडे माढा मतदारसंघाचेच लक्ष असणार आहे.**

### शरद पवार गटाचीही तयारी

**महाविकास आघाडीत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडे माढा येणार आहे. त्यामुळे पवार यांच्या बाजुने राष्ट्रवादी युवकचे प्रदेश सरचिटणीस अभयसिंह जगताप यांनी पूर्ण तयारी केली आहे. मतदारसंघात अनेक कार्यक्रम घेऊन त्यांनी स्वत:ला चर्चेत ठेवले आहे. माण तालुक्यातील ते आहेत. त्यातच माण विधानसभा मतदारसंघात शरद पवार गटाची ताकद अधिक आहे. याचाही ते फायदा घेणार आहेत. पण, सध्या ते उमेदवारीसाठी चर्चेत असलेतरी धैर्यशील मोहिते-पाटीलही हेही भाजपकडून नसेल तर पवार गटाकडून उमेदवारीसाठी प्रयत्न करण्याच्या तयारीत आहेत. यातून उमेदवारीची माळ कोणाच्या गळ्यात पडणार हे एक कोडे आहे.**

# कुणबी मोडी नोंदीचे तातडीने मराठी भाषांतर करण्याची मागणी



**वडूज : प्रांताधिकारी उज्वला गाडेकर यांना निवेदन देताना सकल मराठा समाज बांधव.**

**वडूज :** खटाव माण तालुक्यातील मराठा समाज बांधवांच्या मोडी लिपीतील कुणबी नोंदी तातडीने मराठीत भाषांतर करून देण्याची मागणी आज सकल मराठा समाज बांधवांच्यावतीने प्रशासनाला निवेदनाद्वारे करण्यात आली.

याबाबत प्रांताधिकारी उज्वला गाडेकर यांना निवेदन देण्यात आले. निवेदनावर बाजार समितीचे उपसभापती विजयराव शिंदे, अरूण काकडे, राजेंद्र माने, लालासाहेब माने, दादासाहेब सुर्यवंशी आदींच्या सह्या आहेत

याबाबत निवेदनात दिलेल्या माहितीनुसार, मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून गेली अनेक वर्षे लढा सुरू आहे. मराठा समाजाचे संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या पुढाकार व पाठपुराव्यामुळे सद्या राज्यातील मराठा समाज बांधवांना आरक्षण मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे. श्री. जरांगे पाटील यांनी केलेल्या मागणीनुसार राज्यातील प्रशासकीय यंत्रणा मराठा समाजाच्या मोडी लिपीतील कुणबी नोंदी शोधण्याचे काम करीत आहे. खटाव तालुक्यात सुमारे २७ हजार मोडी लिपीतील कुणबी नोंदी सापडल्या आहेत. या नोंदी मोडी लिपीत असल्याने त्या कोणत्या कुटूंबांच्या नोंदी आहेत हे समजत नसल्याने मराठा समाजात गोंधळाचे वातावरण आहे. त्यामुळे नोंदी सापडूनदेखील त्याचे मराठीत भाषांतर नसल्याने मराठा समाज

बांधवांना कुणबी दाखले मिळविण्यासाठी अर्ज करता येत नसल्याचे चित्र आहे. तालुक्यात सापडलेल्या नोंदींचे मराठीत भाषांतर करून त्या येथील नगरपंचायतीसह गावोगावच्या ग्रामपंचायती, चावडी येथे लावाव्यात. वरीष्ठ प्रशासनाने जाहीर केलेल्या यादीनुसार नगरपंचायतीचे अधिकारी, ग्रामपंचायत, चावडी येथील ग्रामसेवक, गाव कामगार तलाठी यांच्या सहीने जन्म,मृत्यू, दारिद्रय रेषा आदी दाखले देण्यात येतात त्या पध्दतीने संबंधित नोंदीचे दाखले देण्यात यावेत. व तेच प्रस्तावाला ग्राह्य धरण्यात यावेत.

शासनाकडील दफ्तरांत सापडलेल्या मोडी लिपीतील मराठीत भाषांतर करण्यासाठी खासगीमध्ये पाच ते दहा हजार रूपये प्रत्येक नोंदीला खर्च घेऊन मराठा समाजाची लूट करण्याचा प्रकार होत आहे. या प्रकारालाही आळा बसेल. कुणबी दाखले काढण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांच्या पूर्ततेच्या माहितीसाठी कार्यालयात विशेष कक्ष स्थापन करावा. तसेच दाखले काढण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांबाबत सुचना फलकही लावण्यात यावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

दरम्यान शासकीय दस्तऐवजांत सापडलेल्या मोडी लिपीतील कुणबी नोंदींचे मराठीत भाषांतर करण्याबाबत व त्याची प्रशासनाकडून नक्कल देण्याबाबत सुचना करू. तसेच सेतू कार्यालयातील ऑनलाईन प्रणाली व्यवस्थीत राबविण्याबाबत सुचना केली जाईल असे प्रांताधिकारी गाडेकर यांनी सांगितले.



# अकोला जिल्ह्यात २५ हजार घरांच्या छतावर होणार सौर ऊर्जानिर्मिती

**अकोला :** केंद्र शासनाच्या 'सुर्योदय' योजनेत राज्यातील सात जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला असून, यामध्येअकोलाजिल्ह्याचाही समावेश आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील २५ हजार घराच्या छतावर सौर पॅनलच्या माध्यमातून ऊर्जानिर्मिती करण्याचे उद्दिष्ट आहे.देशात एक कोटी घराच्या छतांवर सौर पॅनेलच्या माध्यमातून ऊर्जा निर्मिती करण्याचे उद्दिष्ट असलेली 'सुर्योदय' योजना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केली आहे.

योजनेत राज्यातील पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, लातूर, नागपूरबरोबरच अकोला जिल्ह्यांचाही समावेश आहे. सौरऊर्जेतून निर्माण होणाऱ्या वीजेमुळे ग्राहकाला नेहमीचा वीजपुरवठा कमी वापरावा लागतो व वीजबिलात कपात होते.ग्राहकाच्या सौर पॅनेलमधून त्याच्या वापरापेक्षा जास्त वीज निर्माण झाली तर ती महावितरणच्या ग्रीडमध्ये पाठवली जाते व कंपनी त्या विजेच्या मोबदल्यात वीज देयकात सवलत देते. यातून कधी कधी ग्राहकांना शून्य रकमेचे वीजबिलही येते.

सोलर पॅनेल बसविण्याचा खर्च चार ते पाच वर्षांत भरून निघतो पण त्याचा उपयोग पुढे दीर्घकाळासाठी होत राहतो. सुर्योदय योजनेत छतावर सौर ऊर्जा निर्मितीसाठी कोणत्याही बँकेकडून हप्त्यावर कर्ज उपलब्ध होऊ शकते. सौर ऊर्जानिर्मितीने वीज देयकाच्या वाचणा-या पैश्यातून कर्जफेड शक्य आहे. त्यामुळे ग्राहकांना अधिक सुलभरीतीने आर्थिक भुर्दंडाविना ही सुविधा वापरता येते.केंद्र शासनाकडून अनुदान :१ ते ३ किलोवॅटपर्यंत ४० टक्के अनुदान, ३ किलोवॅटपेक्षा अधिक ते १० किलोवॅटपर्यंत २० टक्के अनुदान, सामूहिक वापरासाठी ५०० किलोवॅटपर्यंत परंतु प्रत्येक घरासाठी १० किलोवॅट मर्यादेसह निवासी गृहनिर्माण संस्था या ग्राहकांना २० टक्के अनुदान मिळते. तीन किलोवॅटपर्यंत क्षमतेचे पॅनेल बसविण्यासाठी सुमारे १ लाख ५७ हजार खर्च येतो व त्यामध्ये सुमारे ५४ हजार रूपयांपर्यंत अनुदान मिळते.सौर ऊर्जेचे अनेक फायदे आहेत. यासाठी केंद्र शासनाकडून अनुदानही देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त ग्राहकांनी योजनेत सहभागी व्हावे.-अजीत कुंभार, जिल्हाधिकारी, अकोला

## तर घराजवळ फिरकणार नाही बिबट्या

# अहमदनगर जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर वापर सुरू



**शिर्डी :** (जि.अहमदनगर) -बिबट्याचीधास्ती नाही असा राज्यात एकही जिल्हा नाही. रात्री-अपरात्री बेसावध असतानाबिबट्यांचेहल्ले होत आहेत. त्यापासून संरक्षण करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या औषधाची मात्रा वापरण्यात येणार असून त्या औषधाचा वास येताच बिबट्याच काय कोणताही वन्यप्राणी जवळ न येता पळून जाईल, सुमारे ४५ दिवस या औषधाचा वास टिकून राहील, विशेष म्हणजे हे सुरक्षित आहे, असा दावा हे औषध निर्माण करणाऱ्या कंपनीने केला आहे. धोका नाही

पुण्यातील मे. पेस्टोसिस एल. एल. पी. या कंपनीने बिबट्यांपासून संरक्षणासाठी एक नवीन पद्धत विकसित केली आहे. या पद्धतीमध्ये बिबट्यांना प्रतिर्षित करणाऱ्या औषधांचा वापर केला जातो.

या औषधापासून बिबट्यांसह इतर वन्यप्राण्यांना कोणताही धोका होत नाही. या औषधाच्या वासाने बिबट्यांना विशिष्ट प्रकारची संवेदना मिळून ते त्या भागातून दूर राहतात असे पेस्टोसिसचे संस्थापक अविनाश साळुंके यांनी सांगितले,वन्यप्राणी जवळ येत नसल्याचा दावा

या औषधामुळे वन्यप्राणी घरे आणि शेताच्या परिसरापासून दूर राहतात. निर्जन व जंगलातून जाताना एखाद्या व्यक्तीने या औषधाचा आपल्या कपड्यांवर अत्तरासारखा वापर केला तर वन्यप्राणी त्याच्याजवळ येत नाहीत, असा दावा अविनाश साळुंके यांनी केला आहे.प्रयोगासाठी शासनाने दिली अनुमती

- हे एक बिनविषारी आणि वासावर आधारित तंत्रज्ञान आहे. या तंत्रज्ञानाचा वापर माकड, डुक्कर, उंदीर, साप, पक्षी आणि रानटी पशू यांसारख्या वन्यप्राण्यांना रोखण्यासाठी केला जाऊ शकतो. या पद्धतीचा वापर आधीच रायगड, अमरावती, रत्नागिरी या जिल्ह्यांसह हिमाचल आणि उत्तराखंड या राज्यांमध्ये डुक्कर, माकड अशा वन्यजीवांसाठी करण्यात आला आहे. ह्यातही वन्यजीवांचा उपद्रव कमी करण्यासाठी पेस्टोसिसला हा पथदर्शी प्रयोग करण्यासाठी शासनाने अनुमती दिली आहे.

## एकाच वेळी १४ ठिकाणी आयकर विभागाच्या धाडी

**नाशिक :** बुधवारी सकाळी सात वाजेच्या सुमारास नाशिकमधील काही बांधकाम व्यावसायिक आणि सरकारी ठेकेदारांची कार्यालये, तसेच घरावर आयकर विभागाने धाडी टाकल्या आहेत. जवळपास १५० अधिकारी ७० वाहनांच्या ताफ्यासह नाशिकमध्ये दाखल झाले आणि त्यांनी एकाच वेळी १४ ठिकाणी धाडी टाकल्या आहेत, तर २० ते २५ ठिकाणी सर्च ऑपरेशन सुरू केले. या धाडीत अधिकाऱ्यांनी काही कागदपत्रे ताब्यात घेतली असल्याचे वृत्त असून अजूनही कारवाई सुरूच असल्याचे समजते.

आयकर विभागाच्या रडावर नाशिकमध्ये बडे व्यावसायिक आणि ठेकेदार असून यापूर्वी काही बांधकाम व्यावसायिक, तसेच कांदा व्यापाऱ्यांवर धाडी टाकलेल्या आहेत. बुधवारी (दि.३१) सकाळपासून पुन्हा धाडसत्र सुरू झाले आहे. सकाळी सात वाजेच्या सुमारास जवळपास ७० वाहनांमधून १५० अधिकारी नाशिकमध्ये दाखल झाले. त्यामध्ये नागपूर आयकर विभागाचे ४२ कर्मचारी आणि ३४ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी शहरात एकाच वेळी धाडसत्र सुरू केल्याने व्यावसायिकांमध्ये धास्ती निर्माण झाली आहे.

# सातारा शहरातील पाणीपुरवठ्याच्या आधुनिकीकरणासाठी ७४.७८ कोटी

### आ. शिवेंद्रसिंहराजे; वॉटर मीटरसह वितरण व्यवस्थेचे होणार ऑटोमायझेशन




**सातारा :** सातारा शहरातील पाणी वितरण व्यवस्थेला सुरळीतपणा यावा आणि नागरिकांना नियमित पाणी मिळावे यासाठी सातारा शहरातील पाणी पाणीपुरवठा, वितरण व्यवस्थेचे ऑटोमायझेशन (स्वयंचलित यंत्रणा) करण्याचा मार्ग आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पाठपुराव्यामुळे मोकळा झाला आहे. यासाठी राज्याच्या नगर विकास विभागामार्फत केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजनेतून ७४.७८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

उपलब्ध निधीतून सातारा शहरातील नळ कनेक्शनला अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त जलमापके म्हणजेच वॉटर मीटर बसविणे, शहापूर येथील जॅकवेलला अत्याधुनिक स्वयंचलित यंत्रणा बसविणे, जकातवाडी आणि सांबरवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्रांना स्वयंचलित यंत्रणा बसविणे, सातारा शहरातील सर्व पाणी साठवण टाक्यांचे अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे नियंत्र करणे, शाहूपुरी येथे वाढीव वितरण नलिका टाकणे, माची पेठ ते पॉवर हाऊस येथे गुरुत्व नलिका व वितरण व्यवस्था करणे तसेच नवीन नळ कनेक्शन व वितरण व्यवस्था टाकणे हि कामे मार्गी लागणार आहेत. यामुळे सातारा शहरातील पाणी वितरण व्यवस्था स्वयंचलित (ऑटोमॅटिक) यंत्रणेमार्फत कार्यान्वित होणार आहे.

आ. शिवेंद्रसिंहराजे यांच्या मागणीनुसार आणि पाठपुराव्यातून या कामासाठी केंद्र शासनाकडून २४.९२ कोटी, राज्य शासनाकडून ३८.६४ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. उर्वरित ११.२२ कोटी रुपये निधी सातारा नगर पालिकेकडून उपलब्ध करण्यात आला आहे. या कामामुळे सातारा शहरातील पाणीपुरवठा, वितरण व्यवस्था आणि पाणी वाटप व्यवस्थापन याला सुसूत्रता येणार आहे.

# १४ वर्षे रखडलेल्या हनुमान मंदिर पुर्णत्वासाठी लोकवर्गणीची गरज



**हेरवाड येथील जीर्णोद्धार विना अपूर्ण अवस्थेत असलेला श्री राम मंदिराचा गाभारा.**

**कुरुंदवाड :** रामायणामध्ये प्रभू रामचंद्रांना वनवास भोगावा लागला होता, मात्र, अपुरा पाठपुरावा, लोकप्रतिधींचे दुर्लक्ष आणि राजकीय हेवेदावे यामुळे चक्क हेरवाडचे जागृत देवस्थान असणाऱ्या पवनपुत्र हनुमानाला सलग १४ वर्षे वनवास भोगावा लागल्याचे चित्र शिरोळ तालुक्यातील हेरवाड येथे पहायला मिळाले, मात्र आता लोकप्रतिनिधींनी या मंदिर बांधकामासाठी भरघोस निधी दिला आहे मात्र, राहिला प्रश्न गाभाऱ्याचा... गाभाऱ्याला शासनाच्या योजनेतून कोणताच निधी मिळत नसल्याने सदरचा गाभारा हा लोकवर्गणीतूनच पूर्ण करावा लागणार असल्याने गावातील नागरिकांनी, दानशूरांनी आणि भक्तांनी पुढे येऊन गाभाऱ्यासाठी मदतीसाठी पुढे येणे गरजेचे बनले असून या गाभाऱ्यासाठी पैशांची उपलब्धता झाली तर मंदिर लवकरच पूर्ण होणार आहे. त्यामुळे गावातील दानशूर आणि भक्तांनी सढळ हाताने मदत करून मंदिर पूर्णत्वासाठी हातभार लावण्याची गरज निर्माण झाली आहे.

संत रामदास यांनी स्थापन केलेल्या हनुमान मंदिराचा जिर्णोध्दार करण्याच्या दृष्टीने २००८ साली जुने मंदिर पाडण्यात आले होते, त्यानंतर हनुमानची प्रतिष्ठापणा नदीकाठावर करण्यात आली. वारंवार येणारे महापुर, दूषित पाण्याचा घेराव या सर्व हाल - अपेष्टा जागृत देवस्थान असलेल्या हनुमानाला सहन करावा लागला.

संपूर्ण राज्यामध्ये संत रामदास स्वामींनी दक्षिणमुखी १४ हनुमान मुर्तीची प्रतिष्ठापणा केली होती, अशी माहिती जुन्या जाणकांरातून देण्यात आली. हेरवाडमध्ये छत्रपती शिवरायांचे हेरखाते असल्यामुळे गडाच्या बाजुला या मंदिराची प्रतिष्ठापणा संत रामदास स्वामींनी केली होती. मंदिर पुरातन असल्यामुळे सन २००८ मध्ये मंदिराची दुरावस्था पाहून मंदिर नवीन बांधण्याच्या दृष्टीने सदरचे मंदिर पाडून या मंदिरातील हनुमान मुर्तीची प्रतिष्ठापणा नदीकाठी करण्यात आली होती. मात्र, मुर्ती इतरत्र हलविल्यामुळे गावात वानरांचा उद्रेक व रोगराई तसेच दुखद घटनांमुळे ग्रामस्थांनी पुन्हा जुनी मुर्ती २०१७ साली म्हणजेच तब्बल १४ वर्षानंतर जुन्या मंदिराच्या ठिकाणी बसविण्यात आल्याची माहिती या मंदिराचे पुजारी बी.एस.गुरव यांनी दिली. दरम्यान लोकप्रतिनिधींनी या मंदिराकडे लक्ष देऊन आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, खासदार धैर्यशील माने, माजी मंत्री सदाभाऊ खोत या लोकप्रतिनिधींनी भरघोस निधी दिल्यामुळे मंदिरापुढे असणारे बांधकाम पूर्ण होत आहे.

दरम्यान हनुमान मंदिर गाभाऱ्यासाठी १२ ते १५ लाख रुपयांच्या निधीची गरज असून मंदिराच्या गाभाऱ्याच्या बांधकामासाठी गावातील प्रतिष्ठीत नागरीक, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांनी सढळ हाताने मदत करुन गेल्या १४ वर्षे रखडलेल्या मंदिराचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी पुढे येण्याची गरज निर्माण झाली आहे.




**राष्ट्रीय महामार्गाला जोडणार्या रायगड जिल्ह्यातील भोगावती पुलाच्या निकृष्ट कामाची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार !**

# प्रवाशांची जिवीतहानी झाल्यास दोषी अधिकाऱ्यावर ३०२ चा गुन्हा नोंदवा : सुराज्य अभियान

राष्ट्रीय महामार्गाला जोडणार्या रायगडमधील पेन-खोपोली महामार्गांवरील भोगावती नदीवरील पुलाचे रेलिंग तुटले आहे. काही दिवसांपूर्वीच या पुलावरून रात्री जाणारी कार पुलावरून खाली पडली. सुदैवाने गाडीतील प्रवासी वाचले; परंतु भविष्यात पुन्हा अशी दुर्घटना घडल्यास आणि त्यामध्ये कुणाला दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्याला जबाबदार कोण ? पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला होत असलेली दिरंगाई नागरिकांच्या जीवावर बेतणारी ठरू शकते. त्यामुळे पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला दिरंगाई करणार्या अधिकार्यांवर कारवाई करावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीच्या सुराज्य अभियानाकडून करण्यात आली आहे. या पुलाच्या निकृष्ट कामाविषयी सुराज्य अभियानाकडून थेट मुख्यमंत्री आणि सार्वजनिक बांधकाममंत्री (सार्वजनिक उपक्रमांसह) एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार केली आहे, अशी माहिती सुराज्य अभियानाचे समन्वयक श्री. अभिषेक मुरुकटे यांनी दिली आहे.

भोगावती नदीवरील पुलावरून जाणारा मार्ग राष्ट्रीय महामार्गाला जोडतो. काही महिन्यांपूर्वीच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून या पुलावरील लोखंडी रेलिंगचे काम करण्यात आले. पुलाच्या डागडुजीसाठी ३५ लाख रुपये खर्चही करण्यात आले; मात्र त्यानंतरही पुलाची स्थिती अत्यंत बिकट आहे. पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचेच हे द्योतक आहे. यामध्ये भ्रष्टाचार झाल्याची शक्यताही नाकारता येत नाही. सद्यस्थितीत हा पूल धोकादायक आहे. वर्ष २०१६ मध्ये रायगड जिल्ह्यातच महाड येथे सावित्री नदीवरील पुलावरून एस्.टी. च्या गाड्या नदीत कोसळून ४० नागरिकांचा मृत्यू झाला होता. भोगवती नदीच्या पुलावर पुन्हा दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या पुलाचे तातडीने 'स्ट्रक्चरल ऑडिट' (संरचनात्मक लेखापरीक्षा) करून तातडीने दुरुस्ती करावी. पुलाचे काम होईपर्यंतच्या कालावधीत दुर्घटना घडून कुणाचा अपमृत्यू झाल्यास त्या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा अर्थात् भा.दं.वि. संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात यावा, अशी मागणी सुराज्य अभियानाकडून करण्यात आली असल्याचे श्री. मुरुकटे यांनी सांगितले आहे.

# कोयना अभयारण्यग्रस्त वेळे, मळेचा ३५ वर्षांचा प्रश्न सुटला

## पुनर्वसनास केंद्राची अंतिम मान्यता : गावांना मिळणार आता सर्व नागरी सुविधा

**सातारा** : कोयना अभयारण्यग्रस्त वेळे आणि मळे गाव प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनास केंद्र शासनाची अंतिम मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे या गावांचा ३५ वर्षांपासून रखडलेला प्रश्न सुटला आहे. तसेच या गावांना आता सर्व नागरी सुविधाही मिळणार आहेत.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसुचनेद्वारे कोयना अभयारण्याची निर्मिती करण्यात आली. यामध्ये सातारा जिल्ह्यात सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्रातील कोअर झोनमध्ये एकूण ५२ गावांचे क्षेत्र समाविष्ठ आहे. त्यापैकी १९ गावे ही कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे पूर्वीच पुनर्वसित झालेली आहेत. तसेच १८ गावांचे अभयारण्यातील हक्क कायम केलेले आहेत. उर्वरित १५ गावांचे पुनर्वसन अभयारण्याबाहेर करायचे आहे. त्यामधील १० गावांची पुनर्वसन झाले आहे. तर ५ गावांची पुनर्वसन प्रक्रिया सुरु आहे. यामध्ये जावळी तालुक्यातील वेळे गावाचा समावेश आहे. या गावामध्ये एकूण १३५ प्रकल्पग्रस्त असून त्यापैकी ६१ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन खंडाळ्यातील वनक्षेत्रावर करण्यात येत आहे. या खातेदारांचे पुनर्वसन करण्यासाठी ११२.२५ हेक्टर आर वनक्षेत्र निर्वणीकरणाचा प्रस्ताव जुलै २०२१ मध्ये सातारा वनविभागाने केंद्र शासनास सादर केला होता.

पाटण तालुक्यातील मळे या गावाचाही यामध्ये समावेश आहे. गावामध्ये एकूण १४० प्रकल्पग्रस्त आहेत. त्यातील २० प्रकल्पग्रस्तांनी पर्याय एकचा तर १२० खातेदारांनी पर्याय दोनचा स्वीकार केला आहे. मळे गावातील १२० प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन सातारा जिल्ह्यातील पाटण व कऱ्हाड तालुक्यामध्ये करण्यात येत आहे. यासाठी कऱ्हाड आणि पाटण तालुक्यातील २२७.९ हेक्टर आर वनक्षेत्र निर्वणीकरणाचा प्रस्ताव जून २०२१ मध्ये वनविभागाने केंद्र शासनास सादर केला होता. आता या गावांच्या पुनर्वसनासही केंद्र शासनाची अंतिम मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे या दोन्ही गावांना सर्व नागरी सुविधा मिळणार आहेत.




### जिल्हाधिकारी, उपवनसंरक्षकांकडून दखल

**अभयारण्यग्रस्तांचा पुनर्वसनाचा ३५ वर्षांपासूनच्या प्रलंबीत प्रश्नाची जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि उपवनसंरक्षक आदिती भरद्वाज यांनी गांभिर्याने दखल घेतली. त्यांच्या विशेष प्रयत्नामुळे तसेच जिल्हाधिकारी आणि उपवनसंरक्षक कार्यालयाच्या योग्य समन्वयामुळे दोन्ही प्रस्तावास २९ जानेवारीला केंद्र शासनाकडून अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. वेळे व मळे गावच्या पुनर्वसनसाठी निर्वणीकरण केलेल्या क्षेत्रावर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन लवकरात लवकर केले जाणार आहे. यासाठी अभिन्यास आराखडा तयार करुन संबंधित गावास महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियमाने १८ नागरी सुविधा पुरविण्यात येणार आहेत.**

# अप्रकाशित साहित्य प्रकाशित करावे : उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील



**मुंबई** : राजर्षी शाहू महाराज, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, महात्मा फ ुले आदी महापुरुषांवर कथा, कादंबऱ्या, लेख, चरित्र लेखन या स्वरूपात साहित्य उपलब्ध आहे. मात्र, अद्यापही संशोधन, अभ्यास करून त्यांच्यावरील साहित्य किंवा तत्कालिन वृत्तपत्रीय लेखन एकसंध उपलब्ध नाही किंवा असे साहित्य लोकापर्यत पोहोचलेले नाही. त्यामुळे चरित्र साधने प्रकाशन समित्यांनी संबंधित महापुरूषांवरील अप्रकाशित साहित्याचा शोध घेऊन त्याचे प्रकाशन करून लोकांपर्यत आणावे, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज केले.

डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या सभागृहात महापुरुषांवरील विविध चरित्र साधने प्रकाशन समित्यांच्या बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी समित्यांच्या कामकाजाचा आढावा घेताना मंत्री श्री. पाटील बोलत होते. बैठकीस प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, उपसचिव अशोक मांडे आदींसह साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव प्रा. संजय दासू शिंदे, लोकमान्य टिळक समितीचे सदस्य सचिव डॉ. श्रद्धा कुंभोजकर, राजर्षी शाहू महाराज समितीचे सदस्य सचिव डॉ. विजय चोरमारे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समितीचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीचे सदस्य सचिव डॉ. भावार्थ देखणे आदी उपस्थित होते.


सर्व प्रकाशन समित्यांना पुणे येथे जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचना देत मंत्री श्री. पाटील म्हणाले, मध्यवर्ती ठिकाणी सर्व समित्यांची कार्यालये, कॉन्फरन्स हॉल, बैठक व्यवस्थेसह एकच कार्यालय विकसित करण्यात यावे. यामध्ये डिजिटलायझेशनची व्यवस्था असावी. जोपर्यत स्वतंत्र कार्यालयाची व्यवस्था होत नाही, तोपर्यत उच्च शिक्षण संचालक कार्यालयातील कॉन्फरन्स हॉलचा बैठकांसाठी उपयोग करण्यात यावा.

## धनगर आरक्षण मागणीसाठी शासनाचा निषेध म्हणून कडकडीत बंद

बिदाल : धनगर आरक्षणाच्या मुद्यावरून सुरू केलेल्या आमरण उपोषणाकडे प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप धनगर समाजाच्या वतीने करण्यात आला असून प्रशासनाचे लक्ष वेधुन घेण्यासाठी आज माण तालुक्यात कडकडीत बंद पाळण्यात आला याला व्यापारी वर्गाकडून आपली दुकाने बंद ठेऊन पाठिंबा देणेत आला.आज सकाळी धनगर समाजातील शेकडो कार्यकर्ते उपोषण स्थळी एकत्र जमले होते यावेळी म्हसवड शहरातून कार्यकर्त्यांनी बाईक रॅली काढली यावेळी उपोषणकर्ते एकटे नसून संपूर्ण धनगर समाज त्यांच्या पाठीशी राहणार असल्याचा निर्धार यावेळी समाजाकडून संदेश देणेत आला आहे.

# ज्ञानवापी मशिदीच्या तळघरात हिंदूंना पूजा करता येणार

## न्यायालयाचे निर्देश



**मुंबई** : वाराणसी न्यायालयाने बुधवारी हिंदू भाविकांना ज्ञानवापी मशिदीच्या तळघरात प्रार्थना - पूजा करण्याचा अधिकार बहाल केला आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार हिंदू भाविक 'व्यासाचे तळघर' (व्यास का तेखाना) मध्ये पूजा करू शकतात. सध्या मशिदीतील हा भाग बंद ठेवला गेलेला आहे. जिल्हा प्रशासनाने पुढील सात दिवसांत हिंदूंना त्याठिकाणी पूजाअर्चा करण्याची व्यवस्था करून द्यावी, असेही निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

या निकालानंतर हिंदू पक्षकारांचे वकील विष्णू शंकर जैन यांनी एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, व्यासाचे तळघर येथे हिंदूंना पूजाअर्चा करण्यासाठी न्यायालयाने परवानगी दिली आहे. आता जिल्हा प्रशासनाने सात दिवसांच्या आत तिथे व्यवस्था करून द्यावी, जेणेकरून तिथे प्रत्येकाला पूजा करण्याची संधी मिळेल. यानिर्णयानंतर हिंदू पक्षकारांनी न्यायालयाबाहेर आनंद व्यक्त केला.

ज्ञानवापी मशीद हिंदूंच्या ताब्यात द्या', केंद्रीय मंत्र्याचे मुस्लीमांना आवाहन; म्हणाले, सलोखा राखण्यासाठी

वाराणसी जिल्हा प्रशासनाने २४ जानेवारी रोजी ज्ञानवापी मशिदीच्या आवारातील दक्षिणेकडे असलेल्या तळघराचा ताबा घेतला होता. आचार्य वेद व्यास पीठ मंदिराचे मुख्य पुजारी शैलेंद्र कुमार पाठक यांनी यासंबंधी खटला दाखल केला होता. त्यानंतर वाराणसी जिल्हा न्यायालयाने मशिदीच्या दक्षिणेकडील तळघराचा ताबा वाराणसी जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे दिला होता.

हिंदूंचे स्वप्न पूर्ण झाले आहे. जिल्हा प्रशासन सात दिवसांत तिथे व्यवस्था उभी करणार आहे. त्यानंतर हिंदू तिथे पूजाअर्चा सुरू करतील. काशी विश्वनाथ ट्रस्टकडून पूजापाठ केली जाईल. आमचे कायदेशीर लढाई होती, ती पूर्ण झाली आहे. यापुढे आता काशी विश्वनाथ पीठ ट्रस्ट निर्णय घेईल. न्यायाधीश के. एम. पांडे यांनी १ फेब्रुवारी १९८६ रोजी राम मंदिराचे टाळे उघडण्याचा निर्णय दिला होता. आजच्या निर्णयाची तुलना आम्ही न्यायाधीश पांडे यांच्या निर्णयाशी करत आहोत. वाराणसी जिल्हा न्यायालयाचा निर्णय ऐतिहासिक असा आहे. याआधी सरकारांनी सत्तेचा दुरूपयोग करून हिंदू समाजाची पूजापाठ रोखले होते, त्याला आज न्यायलयाने खोडून काढले आहे. यापुढे आता वजूखान्याचा सर्व्हे करणे, हे आमच्या लक्ष्य असेल, अशी प्रतिक्रिया हिंदू पक्षकारांचे वकील विष्णू शंकर जैन यांनी दिली. जुलै २०२३ मध्ये वाराणसी जिल्हा न्यायालयाने भारतीय पुरातत्व विभागाला मशिदीमध्ये वैज्ञानिक सर्व्हे करण्याचे निर्दे श दिले होते. मशिदीच्या आवारात यापूर्वी हिंदू मंदिर अस्तित्वात होते का? याचे पुरावे शोधण्यासाठी सर्वेक्षण करण्याची परवानगी देण्यात आली होती.

**वाराणसीमध्ये असलेल्या काशी विश्वनाथ मंदिराच्या बाजूला ज्ञानवापी मशीद आहे. याच ज्ञानवापी मशीद परिसरात अगोदर मंदिर होते, असा दावा केला जातो; तर मुस्लीम पक्षकारांकडून हा दावा फेटाळण्यात येतो. हा वाद सध्या न्यायालयात पोहोचलेला आहे. २०२२ मध्ये पाच हिंदू महिलांनी ज्ञानवापी मशीद परिसराच्या बाहेरच्या भिंतीला लागून असलेल्या माँ श्रीनगर गौरीची पूजा करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी केली होती. त्यासाठी या महिलांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यानंतर हे प्रकरण चांगलेच चर्चेत आले.**

# ठाकरे गटाचे माजी आमदार सूर्यकांत दळवी भाजपामध्ये




दापोली- मंडणगड मतदारसंघाचे सलग २५ वर्षे प्रतिनिधीत्व केलेले उबाठा गटातील माजी आमदार सूर्यकांत दळवी, दापोली पंचायत समितीचे माजी सभापती शांताराम पवार ,राष्ट्रवादी चे नेते व रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी संचालक प्रकाश शिगवण यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी गुरुवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, आ. प्रशांत ठाकूर, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, विजय चौधरी, माजी आमदार विनय नातू , भाजपा उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष केदार साठे, सतीश धारप आदी उपस्थित होते.

या वेळी प्रदेशाध्यक्ष श्री. बावनकुळे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेक पक्षातील कार्यकर्ते व पदाधिकारी भाजपा मध्ये प्रवेश करीत आहेत. श्री. सूर्यकांत दळवी, शांताराम पवार, प्रकाश शिगवण यांच्या प्रवेशाने पक्षाला कोकणात मोठे बळ मिळणार आहे. कोकणातील विकासाचे प्रश्न त्वरित मार्गी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्याचे आश्वासन श्री. बावनकुळे यांनी दिले. भाजपामध्ये प्रवेश केलेल्या सर्वांचा यथोचित सन्मान राखला जाईल असेही त्यांनी नमूद केले. कोकणाच्या विकासाचा ध्यास घेतलेले उमदे व्यक्तिमत्व अशा शब्दांत सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सूर्यकांत दळवी यांचे कौतुक केले. भाजपा हा एक परिवार असून, परिवारात सामील झालेल्या प्रत्येक सदस्याचे मनापासून स्वागत केले जाते. कोकणाच्या विकासाला गती देण्यासाठी आमचे सरकार कटीबद्ध असून ज्या विश्वासाने दळवी यांच्यासोबत सर्वांनी भाजपा मध्ये प्रवेश केला आहे त्या विश्वासास आमचा पक्ष पात्र ठरेल असेही श्री. चव्हाण यांनी सांगितले.

श्री. दळवी म्हणाले की सलग २५ वर्षे आमदार असून देखील उद्धव ठाकरे यांनी नेहमीच आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. आमच्या कोकणाच्या विकासासाठी आम्ही भाजपा प्रवेशाचा निर्णय घेतला. यापुढे भाजपा वाढीसाठी अहोरात्र परिश्रम करू, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. नाशिक जिल्हयातील राष्ट्रवादी काँग्रेसचे व उबाठा चे कार्यकर्ते किरण शिंदे,सचिन गुंजाळ, किरण पवार, भाऊसाहेब साबळे आदींनीही भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.



**संयुक्त अरब अमिरातीची राजधानी अबुधाबीमध्ये पहिले पारंपरिक हिंदू मंदिर बांधून पूर्ण झाले आहे. BAPS संस्था मंदिर हे ण-ए मधील सर्वात मोठे मंदिर असणार आहे. हे मंदिर अतिशय सुंदर असून दगडांनी बनवलेल्या या मंदिरावर खूप चांगले कोरीवकाम देखील करण्यात आले आहे. मंदिराचे उद्घाटन १४ फेब्रुवारीला होणार आहे. या सोहळ्यासाठी इ-झड स्वामीनारायण संस्थेचे विद्यमान आध्यात्मिक गुरू परमपूज्य महंत स्वामी महाराज आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीही उपस्थित असणार आहेत. १८ फेब्रुवारीपासून हे मंदिर सर्वसामान्यांसाठी खुले होणार आहे.**